मा. प्राचार्यसाहेब.

दैनिक सकाळ दि. 8/01/2020 पान नं. 8 (पुणेजिल्हा)

सकाळ 08/01/2020 पान नं. 8 (पुणे जिल्हा)

# बारामतीत 'अनेकांत आविष्कार'

**बारामती, ता. ७ :** तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयात अनेकांत आविष्कार उपक्रम नुकताच पार पडला. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी या उपक्रमाचे उद्घाटन केले. 'माय इनोव्हेटिव्ह रोल फॉर इंडिया' ही संकल्पना विद्यार्थ्यांना देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी यावर आधारित विविध स्पर्धा व प्रदर्शनात भाग घेतला.

विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ आणि कृतिशील बनून देशासाठी योगदान द्यावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. मुरूमकर यांनी केले. कला, विज्ञान, वाणिज्य व व्यवसाय शिक्षण शाखेतील विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण ७० वर्किंग मॉडेल्स या प्रदर्शनात मांडली होती. प्रदर्शनाची पाहणी करताना प्राचार्य डॉ. मुरूमकर; तसेच उपप्राचार्या वैशाली माळी यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमांचे कौतुक केले.



**बारामती : टीसी महाविद्यालयातील अनेकांत आविष्कार उपक्रमाची पाहणी करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व मान्यवर.**

वक्तृत्व, निबंध, काव्यवाचन, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर, रांगोळी, घोषवाक्य, पाककला, पुष्परचना, शॉर्ट फिल्म मेकिंग आदी स्पर्धांचे आयोजन या वेळी केले होते. सांस्कृतिक कलाविष्कारही सादर केले गेले.

अनेकांत आविष्कार समितीचे प्रमुख संजय शेंडे यांनी नियोजन केले. समन्वयक राजेंद्र आगवणे व गोरखनाथ मोरे यांनी परिश्रम घेतले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

साप्ताहिक रणशिंग दि. ९/१/2020 पान नं. १५

## श्री. रामकृष्ण सुरवडे यांचा सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा उत्साहात संपन्न




बारामती - तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे निवृत्त प्रबंधक व शहरातील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि स्वयंसेवी संस्थाचे अध्वर्यू श्री. रामकृष्ण लिंबराज सुरवडे यांचा ८१ वा वाढदिवस अर्थात सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा गुरुवार दि. २ जानेवारी २०२० रोजी सायंकाळी वीरशैव मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात व थाटामाटात संपन्न झाला.

याप्रसंगी आयोजित केलेल्या विशेष समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर उपस्थित होते. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (माजी) शहराध्यक्ष श्री. सुभाष आप्पा ढोले, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. माधव जोशी, नगरसेवक श्री. सुनिल सस्ते, नगरसेवक जयसिंग अशोकका देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी श्री. सुरवडे यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव केला. तसेच महाविद्यालयाच्या उभारणी व वाटचालीमध्ये त्यांचे योगदान तसेच विविध सामाजिक संस्थांमध्ये त्यांचा असणारा सहभाग याचा आदर्श सर्वांनी घेण्यासारखा असल्याचे नमूद केले. लहानपणीच आईवडिलांचे छत्र हरपल्यानंतर अनेक नातेवाईकांनी केलेला त्यांचा सांभाळ, प्रतिकूल परिस्थितीत घेतलेले शिक्षण आणि पडेल ते व मिळेल ते काम करीत महाविद्यालयाच्या नोकरीत स्थिरावल्यानंतर आपल्यासारख्या गरजूंना सढळ हस्ते मदत करण्याचे घेतलेले अव्याहत व्रत आजही श्री. सुरवडे यांनी अखंडपणे सुरू ठेवले असल्याचेही प्रतिपादन त्यांनी केले. याप्रसंगी माजी प्राचार्य एस.पी. कदम, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष माधव जोशी, वृद्धाश्रमाचे प्रमुख विश्वस्त डॉ. मुरलीधर घोळवे, प्रा.डॉ. धनसिंग जगताप, श्री. रमेश गलांडे, श्री. नितीन सुरवडे, श्री. प्रदीप येवले यांनी समयोजित मनोगते प्रकट केली. श्री. प्रदीप येवले यांनी त्यांना सन्मानपत्र प्रदान केले. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत केक कापण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन समीर संजय सुरवडे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. सुरेश साळुंके यांनी केले. या कार्यक्रमासाठी शहरातील वि[illegible] मान्यवर, ज्येष्ठ नागरिक, तुळजा[illegible] चतुरचंद महाविद्यालयाचा स्टाफ, श्री. सुरवडे अण्णा यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साप्ताहिक रणशिंग दिनांक ९/१/2020 पान नं. 2

## अनेकान्त फुटबॉल संघाची राष्ट्रीय पातळीवर निवड



बारामती-आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसा-निमित्त अखिल भारतीय खेलो [illegible]संघ, ऑल महाराष्ट्र स्टेट स्पोर्टस चॅम्पियनशिप २०२० यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेमध्ये अनेकान्त इंग्लिश मिडियम स्कूलच्या १४ वर्षाखालील फुटबॉल संघाने उत्तुंग यश संपादन केले आहे. औरंगाबाद विरुद्ध पुणे असा हा सामना खेळला गेला. या चुरशीच्या सामन्यामध्ये ३/१ गुण मिळवून अनेकान्त संघ उपविजयी ठरला. या संघास रजकपदक, सन्मानचिन्ह, व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. या संघाची पुढील राष्ट्रीय पातळीवरील फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्कूलच्या प्राचार्या राखी माथुर व समन्वयिका स्मिता ढवळीकर यांनी यशस्वी संघाचे अभिनंदन केले.

साप्ताहिक रणशिंग दि ९/१/2020 पान नं. १४

## वक्तृत्व स्पर्धेत अनेकान्तचे यश

बारामती-येथील अनेकान्त इंग्लिश मिडियम स्कूलचा इ.७ वीतील विद्यार्थी चि.सोहम गणेश लडकत याने मिळवली ना. बारामती येथील कै. नामदेव आण्णा स्मृतिचषक, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत वैयक्तिक सर्वसाधारण मुलांमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. या स्पर्धेमध्ये ३४ विद्यालयातील १०८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

त्याच्या या यशाबद्दल स्कूलच्या प्राचार्या राखी माथुर व समन्वयिका स्मिता ढवळीकर यांनी त्याचे अभिनंदन केले.

WWW.INDIANEXPRESS.COM
THE INDIAN EXPRESS, THURSDAY, JANUARY 2, 2020



**Anekant Education Society's**

# Tuljaram Chaturchand College of

(Arts, Science and Commerce)

**Baramati Dist :- Pune – 413 102 (M.S.)**

Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune

**Autonomous**

**Religious Minority Institution**

website : www.tccollege.org e-mail :- principal.tccollege@gmail.com

Phone No : (02112) 222405 / 223635

# REQUIRED

Applications are Invited from Eligible Candidates for the Full Time **Grantable Principal Post.**

| Name of the Post | No. of Post | Reservation |
|---|---|---|
| Principal | 01 | Open to all |

1) Educational Qualification, Experience, Pay Scale etc. applicable for the post are as per norms specified by UGC, Government of Maharashtra Resolution dated 08 March, 2019 and 10 May,2019 and Savitribai Phule Pune University, Pune as modified from time to time.
2) Candidates applying for post of Principal should submit their verified **API – as per UGC 5th Notification, dated 18th July, 2018** (Academic Performance Indicator) certificate from Savitribai Phule Pune University, Pune with all documents along with application form.
3) The appointment to the post of Principal will be for tenure of five years from the date of appointment or up to attainment of superannuation, whichever is earlier.
4) T.A./D.A. will not be paid for attending the Interview.
5) Application must be enclosed with the certified Photo copy of the original documents pertaining to Educational qualifications.
6) Incomplete applications and application received after the last date will not be considered. The Institute / College will not be responsible for postal delay, if any.
7) Application along with all the necessary documents should reach within **15 days** from date of Publication of this advertisement. to The Secretary, Anekant Education Society, (T. C. College Campus) Post Box No. 51, Baramati Dist. Pune 413 102 (M.S.)
8) Any type of unnecessary communication with institute, college or concerned authorities or recommendations from any other persons favoring or influencing the selection procedure will be treated as disqualification and candidature of concerned applicant will be rejected at any stage.
9) This advertisement is made as per No Objection Certificate from Jt. Director (Higher Education), Pune Region, Pune vide letter No. JDHEPune/NOC/2019/35, dated 20-12- 2019.
10) **Preference will be given to 'Jain' Religious Candidate.**

**Secretary**
**Anekant Education Society,**
**Baramati**

Tuljaram Chaturchand College Library Baramati

लोकसत्ता पुणे दिनांक

WWW.LOKSATTA.COM

पुणे, गुरुवार, २ जानेवारी २०२० ३

**Anekant Education Society's**

# Tuljaram Chaturchand College of

(Arts, Science and Commerce)

**Baramati Dist :- Pune – 413 102 (M.S.)**

Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune

**Autonomous**

**Religious Minority Institution**

website : www.tccollege.org e-mail :- principal.tccollege@gmail.com

Phone No : (02112) 222405 / 223635

# REQUIRED

Applications are Invited from Eligible Candidates for the Full Time **Grantable Principal Post.**

| Name of the Post | No. of Post | Reservation |
|---|---|---|
| Principal | 01 | Open to all |

1) Educational Qualification, Experience, Pay Scale etc. applicable for the post are as per norms specified by UGC, Government of Maharashtra Resolution dated 08 March, 2019 and 10 May,2019 and Savitribai Phule Pune University, Pune as modified from time to time.
2) Candidates applying for post of Principal should submit their verified **API – as per UGC 5th Notification, dated 18th July, 2018** (Academic Performance Indicator) certificate from Savitribai Phule Pune University, Pune with all documents along with application form.
3) The appointment to the post of Principal will be for tenure of five years from the date of appointment or up to attainment of superannuation, whichever is earlier.
4) T.A./D.A will not be paid for attending the Interview.
5) Application must be enclosed with the certified Photo copy of the original documents pertaining to Educational qualifications.
6) Incomplete applications and application received after the last date will not be considered The Institute College will not be responsible for postal delay, if any
7) Application along with all the necessary documents should reach within **15 days** from date of Publication of this advertisement. to The Secretary, Anekant Education Society, (T. C. College Campus) Post Box No. 51, Baramati Dist. Pune 413 102 (M.S.)
8) Any type of unnecessary communication with institute, college or concerned authorities or recommendations from any other persons favoring or influencing the selection procedure will be treated as disqualification and candidature of concerned applicant will be rejected at any stage
9) This advertisement is made as per No Objection Certificate from Jt. Director (Higher Education), Pune Region, Pune vide letter No. JDHE Pune NOC 2019/35, dated 20-12- 2019.
10) **Preference will be given to 'Jain' Religious Candidate.**

**Secretary**
**Anekant Education Society,**
**Baramati**

गुरुवार, ०२ जानेवारी २०२० पुणे शहर पुढारी ५

Anekant Education Society's

**Tuljaram Chaturchand College,**

(Arts, Science and Commerce),

**Baramati Dist :- Pune- 413 102 (M.S.)**

Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune

**Autonomous**

**Religious Minority Institution**

Website :- www.tccollege.org e-mail :- principal.tccollege@gmail.com

**Phone No. (02112) 222405 / 223635**

# REQUIRED

Applications are invited from Eligible Candidates for the Full Time Grantable Principal Post.

Grantable Principal Post.

| Name of the Post | No. of Post | Reservation |
|---|---|---|
| Principal | 01 | Open to all |

1) Educational Qualification, Experience, Pay Scale etc, applicable for the post are as per norms specified by UGC, Government of Maharashtra Resolution dated 08 March, 2019 and 10 May, 2019 and Savitribai Phule Pune University, Pune as modified from time to time.
2) Candidates applying for post of Principal should submit their verified API. as per UGC 5 Notification, dated 18th July, 2018 (Academic Performance Indicator) certificate from Savitribai Phule Pune University, Pune with all documents along with application form.
3) The appointment to the post of Principal will be for tenure of five years from the date of appointment or up to attainment of superannuation, whichever is earlier.
4) TA/D.A. will not be paid for attending the Interview.
5) Application must be enclosed with the certified Photo copy of the original documents pertaining to Educational qualifications.
6) Incomplete applications and application received after the last date will not be considered. The Institute / College will not be responsible for postal delay, if any.
7) Application along with all the necessary documents should reach within 15 days from date of Publication of this advertisement to The Secretary, Anekant Education Society, (T. C. College Campus) Post Box No. 51, Baramati Dist, Pune - 413 102 (M.S.)
8) Any type of unnecessary communication with institute, college or concerned authorities or recommendations from any other persons favoring or influencing the selection procedure will be treated as disqualification and candidature of concerned applicant will be rejected at any stage.
9) This advertisement is made as per No Objection Certificate from Jt.Director (Higher Education), Pune Region, Pune vide letter No. JDHEPune/NOC/2019/35, dated 20-12-2019
10) Preference will be given to 'Jain' Religious Candidate.

**Secretary**
Anekant Eduacation
Society Baramati

मा. प्राचार्य साहेब

दैनिक पुढारी दि. 02/1/2020 पान नं 7 (My पुणे)

आमचे आधारस्तंभ

**मा.अजितदादा पवारसाहेब**



यांची महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी

तसेच आमचे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी

**श्री.दत्तात्रय (मामा) भरणे**



यांची राज्यमंत्री

पदी निवड झाल्याबद्दल

**हार्दिक शुभेच्छा !**

शुभेच्छुक

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

अरहतदास हि.शहा (सराफ) अध्यक्ष, जवाहर मो.शहा (वाघोलीकर) सचिव, सुनिल शि. शहा (लेंगरेकर) खजिनदार

श्री.राजकुमार शहा, श्री.मिलींद शहा (वाघोलीकर), श्री.विकास शहा (लेंगरकर), श्री.चंद्रवदन शहा (मुंबईकर),

श्री.चंद्रगुप्त शहा (वाघोलीकर), श्री.चकोर गांधी, डॉ.सुभाष अडदंडे, श्री.पद्माकर पाटील,

डॉ.महावीर अक्कोळे, डॉ.धवल पाटील, श्री.अशोक शिरगुप्पे, श्री.जिनेंद्र दत्तवाडे

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

प्राचार्य, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

## अनेकान्त इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामती

संचालक, सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

## अनेकान्त इंग्लिश मिडीयम स्कूल, बारामती

प्राचार्या, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी


पुढारी दैनिक पुढारीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

A235
6/1/2020

साप्ताहिक रणशिंग दि. १६/०१/२०२० पान नं. १०

# टी.सी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून अंजनगावमध्ये श्रमदान



बारामती-विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाला ख-या अर्थाने भरारी मिळते ती राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये. नेतृत्वगुण, चिकाटी सामाजिक जबाबदारीचे भान विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होते. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना श्रमशिबीरास बारामतीतील तालुक्यातील अंजनगाव येथे सुरुवात झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि टीसी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने होत असलेल्या श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन सोहळा पार पडला.

या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री नारायण शिरगावकर, डीवायएसपी, बारामती होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते. तसेच ॲड. वायकर उपस्थित, यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिरगावकरांनी विद्यार्थ्यांदशेतील आठवणींना उजाळा दिला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना गुन्हेगारीपासून दुर राहण्याचा मोलाचा सल्लाही दिला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य मुरुमकरांनी विद्यार्थ्यांना उद्योजक होण्याचा सल्ला दिला व मार्गदर्शनही केले.

अंजनगाव येथे ४ जानेवारी ते ११ जानेवारी २०२० विशेष श्रमसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये महाविद्यालयातील १७०विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये ८३ मुली आणि ८७ मुलांचा समावेश आहे. संगणक शास्त्र विभागाचे प्रा. व्ही. व्ही कर्डीले हे शिबिराचे कार्यक्रम अधिकारी आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी अंजनगावचे सरपंच मा. सुदाम परकाळे, उपसरपंच मा. प्रदीप वायसे, ग्रामसेविका मा. सौ. प्रतिभा देवकाते तसेच सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेलवे, डॉ. सचिन गाडेकर तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक उपस्थित होते.

साप्ताहिक रणशिंग दि. १६/१/२०२० पान नं. १०

# तु.च. महाविद्यालयातील मुक्ता आंभेरे यांना पीएच.डी.प्रदान




बारामती- तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथील मराठी विषयाच्या प्राध्यापिका डॉ.मुक्ता आंभेरे यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांचा संशोधनाचा विषय मराठी कादंबरीतील आदिवासी स्त्रीचित्रण हा आहे. डॉ.जया कदम, मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. १५ वर्षांपासून मराठी विषयाचे अध्यापनाचे काम त्या करीत आहेत. अनेक व्याख्यानांच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये जनजागृती करण्याचे काम त्या करीत आहेत. त्यांनी अनेक राज्यस्तरीय परिषदांमध्ये सहभाग घेऊन आपले शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव जवाहर शहा व अन्य पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी प्रा.मुक्ता आंभेरे यांचे अभिनंदन केले आहे.

Chaturchand College Library

मा. प्राचार्य साहेब

साप्ताहिक रणशिंग दिनांक १६/०३/२०२० पान नं. ७५

# अनेकान्त स्कूलमध्ये रंगले क्रीडासंमेलन



बारामती-येथील अनेकान्त शिक्षण संस्थेच्या अनेकान्त इंग्लिश मिडियम स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात 'सिनर्जी' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रम सादर झाले. भारतीय तत्वज्ञानात मानवी शरीर हे हवा, पाणी, आग, पृथ्वी या चार समन्वयात्मक घटकांनी बनलेले आहे की जे सर्व सृष्टीचा आधार आहे. अशा विषयांवर आधारित' पी.टी डिस्प्ले' हा अनोखा, रंगतदार कार्यक्रम सादर झाला. भारतीय संघाच्या बेसबॉल खेळाडू रेशमा शिवाजी पुणेकर या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. पालकांनी मुलांना विविध मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित केले पाहिजे असे मत त्यांनी आपल्या भाषणातून मांडले. स्कूलच्या वार्षिक अहवालाचे वाचन प्राचार्या राखी माथुर यांनी केले.

या कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.तसेच विविध स्पर्धांमध्ये प्रावीण्य प्राप्त केलेल्या गुणीजन विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.विद्यार्थी संचलन, हॉकी, कराटे, पिरॅमिड, सॉफ्टबॉल, फुटबॉल इ. खेळांची प्रात्यक्षिके ही सादर झाली. पूर्व प्राथमिक विभागातील चिमुरड्यांनी 'वाऱ्यावरती गंध पसरला' या गीतावर केलेले नृत्य, 'प्लॅस्टिक टाळा' हा संदेश देणारे नृत्य तसेच प्राथमिक विभागातील मुलांनी नृत्यातून साद केलेले आकर्षक देखावे हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.विद्यार्थ्यांनी मैदानावर आपले कलागुण सादर करत प्रेक्षकांची मने खिळवून ठेवली.विविध कलापूर्ण आविष्कारानी हे क्रीडासंमेलन संस्मरणीय ठरले. विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ यांनी कार्यक्रमास प्रचंड प्रतिसाद दिला.

कार्यक्रमप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री अरहतदास शहा (सराफ), स्कूल कमिटीचे अध्यक्ष मिलिंद शहा (वाघोलीकर), धवल शहा (वाघोलीकर), स्वरूप शहा (वाघोलीकर), समन्वयिका स्मि... ढवळीकर, प्रशांत गांधी, सत्य... पंदारकर, सोनिक पंदारकर हे उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक श्री प्रफुल्ल शेळके व सौ.पल्लवी करडे यांनी केले.

मा० प्राचार्यसाहेब

दैनिक सकाळ दि. १६/०१/२०२० पान नं. ५.

Anekant Education Society's

## Anekant English Medium School

T.C.College Campus, Baramati 413102. Dist-Pune.
Ph.:02112-221305. Email-anekantems@gmail.com
Jain Religious Minority Institution

## Admission Opens for Nursery

**Session 2020-2021**

- **Admission form will be available in the school office from Thursday 16th toTuesday 21th January, 2020 from 11am to 3pm.**
- **Preference will be given to 'Jain' candidates.**
- **Admissions also opens for classes 5th to 9th subject to availability of seats. For more details, please contact the school office.**

| Principal | Chairman |
|---|---|
| Anekant English Medium School, Baramati | Anekant English Medium School Committee, Baramati |

साप्ताहिक शारदा दिनांक १६/०१/२०२० पान नं. ९

Anekant Education Society's

## Anekant English Medium School

T.C. College Campus, Baramati 413102. Dist-Pune
Ph.:02112-221305. Email-anekantems@gmail.com
Jain Religious Minority Institution

## Admission Open for Nursery

Session 2020-2021

Admission form will be available in the school office from Thursday 16th to Tuesday 21th January, 2020 from 11 am to 3pm.
Preference will be given to 'Jain' candidates.
Admissions also open for classes 5th to 9th, subject to availability of seats.
For more details, please contact the school office.

| **Principal** | **Chairman** |
|---|---|
| Anekant English Medium School, Baramati | Anekant English Medium School Committee, Baramati |

दैनिक सकाळ दि. १६/०१/२०२० पान नं. ४ (पुणे जिल्हा)

# अनेकांत स्कूलमध्ये नृत्यांतून सामाजिक संदेश

बारामती, ता. १५ : येथील अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नुकतेच वार्षिक स्नेहसंमेलनात 'सिनर्जी' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रम सादर करण्यात आले. या वेळी पूर्व प्राथमिक विभागातील मुलांनी 'वाऱ्यावरती गंध पसरला' गीतावर केलेले; तसेच 'प्लॅस्टिक टाळा' संदेश देणारे नृत्य कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

भारतीय संघाच्या क्रिकेट खेळाडू रेश्मा पुणेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. वार्षिक अहवालाचे वाचन प्राचार्या राखी माथूर यांनी केले. विविध स्पर्धांमध्ये प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला; तसेच विद्यार्थी संचलन, हॉकी, कराटे, पिरॅमिड, सॉफ्टबॉल, फुटबॉल खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. मानवी शरीर हे हवा, पाणी, आग, पृथ्वी या चार घटकांनी बनलेले आहे की जे सर्व सृष्टीचा आधार आहे. अशा विषयांवर आधारित 'पी. टी. डिस्प्ले' हा कार्यक्रम सादर झाला.

संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ, स्कूल कमिटीचे अध्यक्ष मिलिंद वाघोलीकर, धवल वाघोलीकर, स्वरूप वाघोलीकर, समन्वयिका स्मिता ढवळीकर, प्रशांत गांधी, सत्यजित पंदारकर, सोनिक पंदारकर उपस्थित होते. प्रफुल्ल शेळके व पल्लवी करडे यांनी सूत्रसंचालन केले.

दै. पुढारी दि. 20/01/2020 पान नं. ३ (पुणे जिल्हा)

# टी. सी. महाविद्यालयात रस्ता सुरक्षा सप्ताहाची सांगता

**बारामती : प्रतिनिधी**

बारामती येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने ३१ व्या रस्ता सुरक्षा सप्ताहाची सांगता तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात करण्यात आली. वाहतूक सुरक्षा सप्ताहनिमित्त बारामती येथिल विविध शाळातून आयोजित केलेल्या निबंध, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा बक्षिस समारंभ या वेळी पार पडला. या वेळी उपप्रादेशिक परीवहन अधिकारी संजय धायगुडे, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, विटगेट इंडियाचे अधिकारी शौकत शेख, प्रतिक जोशी उपस्थित होते.



रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करताना प्राचार्य डॉ. मुरूमकर आणि आरटीओ अधिकारी.

यावेळी धायगुडे यांनी अपघात झाल्यावर बोलण्यापेक्षा, अपघात होऊ नये म्हणून काळजी घेण्याचे तसेच वाहतूक नियमांचे पालन करत दंड वाचवण्यासाठी नाही तर स्वतःच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. मोटार वाहन निरिक्षक विनायक साखरे यांनी वाहतूक नियमांची माहिती देउन अपघातातील सत्य घटना सांगितल्या. प्रा. मुरूमकर म्हणाले की, चंगळवाद फोफावत चालला आहे. पालकच मुलांना महागडी उपकरणे घेउन देतात पण त्याबाबत सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजी घेत नाहीत. पालकांनी सुरक्षिततेचे संस्कार करणे गरजेचे आहे. आरटीओच्या वतीने अभियानात सक्रीय सहभाग नोंदवणाऱ्या शाळा, महाविद्यालये, ड्रायव्हींग स्कूलचे प्रतिनिधी, वाहन प्रतिनिधी यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक मोटार वाहन निरिक्षक प्रकाश मुळे यांनी केले.

सूत्रसंचालन मोटार वाहन निरिक्षक प्रकाश खटावकर यांनी केले. आभार सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक धैर्यशील लोंढे यांनी मानले.

दै. पुढारी दि. 20/01/2020 पान ३ (पुणे जिल्हा)

---

दैनिक सकाळ दिनांक 20/01/2020 पान नं. ५ (पुणे जिल्हा)

# अपघात होऊ नये यासाठी काळजी घेऊया : धायगुडे

**वडगाव निंबाळकर, ता. १९ :** "अपघात झाल्यावर बोलण्यापेक्षा, अपघात होऊ नये म्हणून काळजी घेऊया... वाहतूक नियमांचे पालन दंड वाचवण्यासाठी नाही, तर स्वतःच्या सुरक्षिततेसाठी करूया... सुरक्षितता ही फक्त घोषणा नाही, तर जीवनाचा मार्ग आहे," असे मत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संजय धायगुडे यांनी व्यक्त केले.

वाहतूक सुरक्षा सप्ताहानिमित्त बारामती येथील विविध शाळांतून आयोजित केलेल्या निबंध, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धांचा बक्षीस समारंभ तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात झाला. या वेळी धायगुडे बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्रा. चंद्रशेखर मुरूमकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून विटगेट इंडिया कंपनीचे जनरल मॅनेजर शौकत शेख, प्रेसिडेंट रोटरी क्लब बारामतीचे प्रतीक जोशी उपस्थित होते. मोटार वाहन निरीक्षक विनायक साखरे यांनी वाहतूक नियमांची माहिती दिली.

आरटीओने जनजागृती अभियानात सहभाग नोंदविणाऱ्या शाळा, महाविद्यालये, ड्रायव्हिंग स्कूलचे प्रतिनिधी, वाहन प्रतिनिधी यांचा सन्मान केला. प्रास्ताविक प्रकाश मुळे यांनी केले. सूत्रसंचालन मोटार वाहन निरीक्षक प्रकाश खटावकर यांनी केले. तर आभार सहायक मोटार वाहन निरीक्षक धैर्यशील लोंढे यांनी मानले.



बारामती : बक्षीस वितरण करताना प्रा. चंद्रशेखर मुरूमकर यांच्यासह आरटीओ अधिकारी.

... ५ (पुणे जिल्हा)

मा. प्राचार्य साहेब

दैनिक सकाळ दि. 20/01/2020 पान नं. 8 (पुणे जिल्हा)




अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या क्रीडा संमेलनास उपस्थित मान्यवर.

# मुलांना मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित करा : रेश्मा पुणेकर

बारामती : प्रतिनिधी

पालकांनी मुलांना मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित केले पाहिजे, असे आवाहन भारतीय संघाच्या बेसबॉल खेळाडू रेश्मा पुणेकर यांनी केले.

बारामती येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या वेळी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून पुणेकर बोलत होत्या. या वेळी संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा, शाळा समितीचे अध्यक्ष मिलिंद शहा, धवल वाघोलीकर, स्वरूप शहा, समन्वयिका स्मिता ढवळीकर, प्रशांत गांधी, सत्यजित पंदारकर, सोनिका पंदारकर आदी उपस्थित होते.

सिनर्जी या संकल्पनेवर आधारित कार्यक्रम या वेळी सादर करण्यात आले. भारतीय तत्त्वज्ञानात हवा, पाणी, आग, पृथ्वी या चार समन्वयात्मक घटकांनी मानवी शरीर बनले आहे. जे सृष्टीचा आधार आहे. या विषयावरील पीटी डिस्प्ले हा अनोखा, रंगतदार कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केला.

विद्यार्थी संचलन, हॉकी, कराटे, पिरॅमिड, सॉफ्टबॉल, फुटबॉल या खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. प्राथमिकच्या मुलांनी नृत्यातून सादर केलेले देखावे आकर्षक ठरले. विविध स्पर्धेत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा या वेळी प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. वार्षिक अहवालाचे प्राचार्या राखी माथूर यांनी वाचन केले.

पुणे जिल्हा सकाळ 20/01/2020 पान 8

ABS

साप्ताहिक रणशिंग - दिनांक. 23/01/2020 पान.नं.10

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आर्मी डे उत्साहात साजरा

बारामती- दरवर्षी संपूर्ण भारतामध्ये १५ जानेवारी रोजी आर्मी डे साजरा करण्यात येतो. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये देखील आर्मी डे अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या संयुक्त विद्यमानाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या हस्ते झाले. या दिवसाचे औचित्य साधून संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागाच्यावतीने विविध शस्त्रास्त्रां विषयीचे नमुने आणि माहितीपर पोस्टर प्रदर्शित केले. यावेळी प्राचार्य डॉ. मुरुमकर यांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे कौतुक केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेलवे, डॉ. सचिन गाडेकर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विभागप्रमुख प्रा. देविदास भोसले यांनी परिश्रम घेतले. यावेळी शहिदांना उपस्थितांकडून श्रद्धांजली वाहण्यात आली.

साप्ताहिक लोकवार्ता दि. 23/01/2020 पान.नं.3

# यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे प्रवेश सुरू

बारामती:- बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे प्रवेश सुरु करण्यात आलेले आहेत विद्यापीठाच्या अधिकृत अभ्यास केंद्रातील महाविद्यालयात पूर्वतयारी (जानेवारी ते मे २०२०) प्रवेशप्रक्रिया सुरु झाली असे पूर्वतयारी पहिली [illegible] आणि १८ [illegible] पूर्ण [illegible] सर्वांसाठी [illegible] आहे, हा कोर्स ५ महिन्यात पूर्ण [illegible] एफवाय [illegible] प्रवेश [illegible] आहे पूर्वतयारी आणि [illegible] बी कोर्स उत्तीर्ण विद्यार्थी १२ वी समकक्ष समजला जातो. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाचा नियम आणि विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही वर्गाचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा आधारकार्ड कोणत्याही वर्गाचे गुणपत्रक आवश्यक आहे. प्रवेशप्रक्रियेसाठी अंतिम तारीख १० फेब्रुवारी आहे. शिक्षण पूर्ण करण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांसाठी प्रवेश घेऊन आपली पदवी पूर्ण करण्याची संधी विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व डॉ सुनील खामगळ यांनी केले.

मा. प्राचार्यसाहेब

साप्ताहिक "वतन की लकीर" दिनांक 23/09/2020 पान नं. 2

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेची राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह निमित्त जनजागृती रॅली संपन्न



बारामती: मोटार वाहन अपघातांत परिणामकारकरीत्या आळा बसावा व नागरीकांमध्ये वाहतुकीच्या नियमांचा प्रचार व प्रसार होण्याकरीता दरवर्षी संपूर्ण देशभरात रस्ता सुरक्षा सप्ताह आयोजित केला जातो. त्याचे औचित्य साधुन तुळजाराम चतुरचंद महाविद्यायलाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जनजागृती रॅली काढून ३१ वे रस्ता सुरक्षा अभियान साजरा करण्यात आला.

या रॅलीचा प्रारंभ उपविभागीय अधिकारी दादासाहेब कांबळे व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. पुढे रॅली भिगवण चौक, इंदापूर चौक, गांधी चौकातून तीन हत्ती चौकात समारोप करण्यात आला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, मोटार वाहन निरीक्षक विकास साखरे, बारामती शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक यशवंत नलवडे, विक्रम निंबाळकर, बारामती नगरपरिषदेचे अतिक्रमण सुरक्षा विभाग प्रमुख संतोष तोडकर, आरोग्य निरीक्षक राजेंद्र सोनवणे इ.मान्यवर उपस्थित होते.

या रॅलीचे आयोजन तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ.विलास कर्डिले, डॉ.चंद्रकांत कांबळे व प्रा.वैभव लांडगे यांनी केले होते. "लागला कान मोबाईलला, थांबवा वाहन साईडला", "डोके आहे सर्वात नाजूक, हेल्मेट लावून व्हा जागरूक", "मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक" अशा विविध विद्यार्थ्यांच्या हातात असणाऱ्या जागृतीसाठी केलेले फलक नागरीकांचे लक्ष वेधत होते.

यावेळी विकास साखरे, नारायण शिरगावकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन ज्ञानेश्वर जगताप यांनी केले व शेवटी आभार डॉ.विलास कर्डिले यांनी मानले.

साप्ताहिक लोकवार्ता दिनांक 23/09/2020 पान नं. 3

# तु.च.महाविद्यालयात रस्ता सुरक्षा सप्ताहाची सांगता

बारामती:- बारामती येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने ३१ व्या रस्ता सुरक्षा सप्ताहाची सांगता तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात करण्यात आली. वाहतूक सुरक्षा सप्ताहनिमित्त बारामती येथील विविध शाळातून आयोजित केलेल्या निबंध, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा बक्षिस समारंभ यावेळी पार पडला. यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संजय धायगुडे, प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, [illegible] इंडियाचे अधिकारी [illegible], प्रतिक जोशी उपस्थित होते.

यावेळी धायगुडे यांनी अपघात [illegible]




[illegible] काळजी [illegible] नियमांचे पालन [illegible] नाही तर [illegible] प्रयत्न [illegible] मोटार वाहन निरीक्षक विनायक साखरे यांनी वाहतूक नियमांची माहिती देऊन अपघातातील सत्य घटना सांगितल्या. प्रा.मुरुमकर म्हणाले की, धगधगाट [illegible] चालला आहे. पालकच मुलांना महागडी उपकरणे घेउन देतात पण त्याबाबत सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजी घेत नाहीत. पालकांनी सुरक्षिततेचे संस्कार करणे गरजेचे आहे. आरटीओच्या वतीने अभियानात सक्रीय सहभाग नोंदवणाऱ्या शाळा, महाविद्यालये, ड्रायव्हींग स्कूलचे प्रतिनिधी, वाहन प्रतिनिधी यांचा सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक मोटार वाहन निरिक्षक प्रकाश मुळे यांनी केले. सूत्रसंचालन मोटार वाहन निरिक्षक प्रकाश खटावकर यांनी केले. आभार सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक धैर्यशील लोंढे यांनी मानले.

मा. प्राचार्य साहेब

साप्ताहिक आक्रोश बारामती फलटण दि. १६/०१/2020 पान नं. 8

# टीसी कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांकडून अंजनगावमध्ये श्रमदान




**बारामती** : विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाला खऱ्या अर्थाने भरारी मिळते ती राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये. नेतृत्वगुण, चिकाटी सामाजिक जबाबदारीचे भान विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होते. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना श्रमशिबीरास बारामतीतील तालुक्यातील अंजनगाव येथे सुरुवात झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि टीसी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने होत असलेल्या श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन सोहळा पार पडला. या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री नारायण शिरगावकर, डीवायएसपी, बारामती होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते. तसेच ॲड. वायकर उपस्थित यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिरगावकरांनी विद्यार्थीदशेतील आठवणींना उजाळा दिला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना गुन्हेगारीपासून दुर राहण्याचा मोलाचा सल्लाही दिला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य मुरुमकरांनी विद्यार्थ्यांना उद्योजक होण्याचा सल्ला दिला व मार्गदर्शनही केले.

अंजनगाव येथे ४ जानेवारी ते ११ जानेवारी २०२० विशेष श्रमसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये महाविद्यालयातील १७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये ८३ मुली आणि ८७ मुलांचा समावेश आहे. संगणक शास्त्र विभागाचे प्रा. व्ही. व्ही. कर्डीले हे शिबिराचे कार्यक्रम अधिकारी आहेत.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी अंजनगावचे सरपंच मा. सुदाम परकाळे, उपसरपंच मा. प्रदीप वायसे, ग्रामसेविका मा. सौ. प्रतिभा देवकाते तसेच सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. सचिन गाडेकर महाविद्यालयाचे प्राध्यापक उपस्थित होते.

ABS 24.1.

साप्ताहिक रणशिंग दिनांक 30/09/2020 पान नं. 10

# तु. च. महाविद्यालयात स्टॅटीस्टिक इन मेडीसीन कार्यशाळा संपन्न

बारामती-तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संख्याशास्त्र विभाग आणि उद्योजकता विकास केंद्रातर्गत दोन दिवसीय स्टॅटीस्टिक इन मेडीसीन या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत गुजरात येथून चारूतर आरोग्य मंडळाचे, प्रा. अजय फाटक यांनी संशोधन कशासाठी? तसेच सॅम्पल साइज कॅलक्युलेशन : मिथस ॲण्ड रॅशनल या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले. प्रा. सौ. जयश्री गंजीवाले यांनी बायोइथिक्स ॲण्ड रिसर्च इथिक्स आणि कोलॅबरेशन ॲण्ड मॅनेजिंग कोलॅबरेशन. प्रोफेशनालिझम या विषयावर सखोल विश्लेषण केले. प्रा. करमचंद पाटील- (भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज, पुणे) यांनी इपिडिमियालॉजिकल स्टडी डिझाईनस व रोल ऑफ स्टॅटिस्टेशन्स इन न्यू ॲव्हेन्यूज या विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना संख्याशास्त्रातील संशोधनाच्या संधी विशद केल्या. स्टॅटीस्टिक इन मेडीसीन या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रातील व ज्ञान-विज्ञानातील संख्या शास्त्राचे उपयोजन करण्याच्या दिशा मिळाल्या. त्याचबरोबरच या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना संशोधनमूल्यांबरोबरच संख्याशास्त्र विषयातील व्यावसायिकतेच्या संधी समजल्या. ही कार्यशाळा विद्यार्थी संशोधकांना उद्योजकतेच्या दृष्टीने दिशादर्शक व प्रोत्साहित करणारे ठरले. तत्पूर्वी प्रा. तृप्ती आरेकर यांनी सर्वांचे स्वागत केले व प्रास्तविकात पाहुण्याचा परिचय करून दिला. प्रा. अजय फाटक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप अध्यक्ष कार्यक्रमाच्या स्थानी होते. उद्योजकता विकास केंद्राचे प्रमुख डॉ. विकास काकडे यांनी सर्वांचे आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. नीलांबरी जगताप यांनी केले या कार्यशाळेचा १२० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

दैनिक सकाळ दिनांक २९/०९/२०२० पान नं. ७ (पुणे जिल्हा ...)

# 'स्टॅटेस्टिक इन मेडिसीन'वर कार्यशाळा

**बारामती, ता. २८ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संख्याशास्त्र विभाग आणि उद्योजकता विकास केंद्रांतर्गत दोन दिवसीय स्टॅटेस्टिक इन मेडिसीन या विषयावर कार्यशाळा झाली. गुजरात येथून चारूतर आरोग्य मंडळाचे अजय फाटक यांनी संशोधन कशासाठी? तसेच सॅम्पल साइज कॅलक्युलेशन : मिथस् ॲण्ड रॅशनल या विषयावर मार्गदर्शन केले.

तर जयश्री गंजीवाले यांनी बायोइथिक्स ॲण्ड रिसर्च इथिक्स आणि कोलॅबरेशन ॲण्ड मॅनेजिंग कोलॅबरेशन, प्रोफेशनॅलिझम या विषयावर, करमचंद पाटील यांनी इपिडिमियालॉजिकल स्टडी डिझाईन्स व रोल ऑफ स्टॅटिस्टेशन्स इन न्यू ॲव्हेन्यूज या विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना संख्याशास्त्रातील संशोधनाच्या संधी सांगितल्या.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रातील व ज्ञान-विज्ञानातील संख्याशास्त्राचे उपयोजन करण्याच्या दिशा मिळाल्या. त्याचबरोबरच या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना संशोधनमूल्यांबरोबरच संख्याशास्त्र विषयातील व्यावसायिकतेच्या संधी समजल्या.

तृप्ती आरेकर यांनी स्वागत केले. उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप अध्यक्षस्थानी होते. डॉ. विकास काकडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन नीलांबरी जगताप यांनी केले. १२० विद्यार्थी कार्यशाळेत सहभागी झाले होते.



बारामती : टीसी महाविद्यालयात आयोजित स्टॅटेस्टिक इन मेडिसीन कार्यशाळेत सहभागी झालेले मान्यवर व विद्यार्थी.

दैनिक पुढारी दि ३१/०१/२०२० पान नं. २ (पुणे जिल्हा)



तुळजाराम महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत सहभागींसह प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व अन्य.

# टीसी महाविद्यालयात कार्यशाळा उत्साहात

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संख्याशास्त्र विभाग आणि उद्योजकता विकास केंद्रांतर्गत दोन दिवसीय औषध सांख्यिकी (स्टॅटिस्टिक इन मेडिसीन) या विषयावर कार्यशाळा उत्साहात पार पडली. उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप अध्यक्षस्थानी होते.

या कार्यशाळेत गुजरात येथून चारुतर आरोग्य मंडळाचे प्रा. अजय फाटक यांनी 'संशोधन कशासाठी?' तसेच 'सॅम्पल साइज कॅलक्युलेशन : मिथ्स ॲण्ड रॅशनल' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. जयश्री गंजीवाले यांनी 'बायोइथिक्स अँड रिसर्च इथिक्स' आणि 'कोलॅबरेशन अँड मॅनेजिंग कोलॅबरेशन', 'प्रोफेशनालिझम' या विषयावर विश्लेषण केले. प्रा. करमचंद पाटील (भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज, पुणे) यांनी 'इपिडिमियालॉजिकल स्टडी डिझाईन्स व रोल ऑफ स्टॅटिस्टेशन्स इन न्यू ॲव्हेन्यूज' या विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना संख्याशास्त्रातील संशोधनाच्या संधी विशद केल्या.

या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रातील व ज्ञान-विज्ञानातील संख्याशास्त्राचे उपयोजन करण्याची दिशा मिळाली. त्याबरोबरच या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना संशोधन मूल्यांबरोबरच संख्याशास्त्र विषयातील व्यावसायिकतेच्या संधी समजल्या. ही कार्यशाळा विद्यार्थी संशोधकांना उद्योजकतेच्या दृष्टीने दिशादर्शक व प्रोत्साहित करणारी ठरली. प्रास्ताविक प्रा. तृप्ती आरेकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नीलांबरी जगताप यांनी केले. उद्योजकता विकास केंद्राचे डॉ. विकास काकडे यांनी आभार मानले.

पुढारी ३१/१/पान.२ पुणे जिल्हा

Tuljaram Chaturchand College * Baramati * Library

मा० प्राचार्य साहेब

शुक्रवार, २८ जानेवारी २०२२ | पुढारी | ५

# मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेत नाशिकची श्रुती बोरस्ते प्रथम

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व बारामती नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४८व्या कविवर्य मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेत नाशिकच्या एचपीटी महाविद्यालयाच्या श्रुती अशोक बोरस्ते हिने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघाचे अवधूत भगवान पाटील आणि ऋषभ सुशील चौधरी वादविवाद स्पर्धेचे मानकरी ठरले. वक्तृत्व स्पर्धेचे विजेतेपद इचलकरंजीच्या नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सच्या तेजस्विनी संजय पांचाळने पटकावले. कनिष्ठ महाविद्यालय विभागामध्ये टी. सी. कॉलेजच्या अक्षय माणिक चौरे याला प्रथम क्रमांक मिळाला.

वक्तृत्व स्पर्धेत मोरोपंत विषयात वरिष्ठ विभागात बाळासाहेब देसाई महाविद्यालय पाटणचा अमृत बापू भिसे, तर कनिष्ठ विभागामध्ये शारदाबाई पवार महिला महाविद्यालयाच्या वैष्णवी गोरख कापरे हिने प्रथम क्रमांक मिळविला. स्पर्धेचे परीक्षण डॉ. दीपाली जाधव, डॉ. विलास बुबा, डॉ. अशोक शिंदे, डॉ. नीलेश जाधव आणि डॉ. शोभा तितर यांनी केले.

स्पर्धेच्या कार्याध्यक्षा डॉ. रंजना नेमाडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. मेधा बडवे यांनी केले. डॉ. सुनील खामगळ यांनी आभार व्यक्त केले. या उपक्रमामध्ये अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शहा व संस्थेचे सचिव मिलिंद शहा यांचे विशेष …दान होते. प्राचार्य डॉ. चंद्रशे… यांचे कार्यक्रमास मार्ग…

Tuljaram Chaturchand College Library Baramati

साप्ताहिक रणशिंग दि. २६/१/2022 पान नं-9

Anekant Education Society's

# Anekant English Medium School (CBSE)

Affiliation No.-1130964

**T.C. College Campus, Baramati 413102, Dist-Pune**

**Ph.-02112-221305 Email-anekantems@gmail.com**

**Jain Religious Minority Institution**

## Admission Opens for Nursery

## Session 2022-2023

- Nursery Admission form will be available in the school office from Monday 24th January to Saturday 5th February, 2022 from 10:00 a.m. to 2.00 p.m.
- Preference will be given to 'Jain' candidates.
- Admission is also open for L.K.G. and class 5th to 9th, subject to availability of seats.

For more details, please contact the school office.

| **Principal** | **Chairman** |
|---|---|
| Anekant English Medium School, Baramati | Anekant English Medium School Committee, Baramati |

Library

साप्ताहिक रणशिंग दि. 26/1/2022 पान.नं. ११

साप्ताहिक रणशिंग 25/1/22 पान ११

# ऑनलाईन कविवर्य मोरोपंत वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा संपन्न

बारामती - विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूर्ण वक्तृत्वाचा आविष्कार म्हणजे कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा. या स्पर्धा दिनांक २१,२२ जानेवारी रोजी संपन्न झाल्या. कोरोना प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर यंदाची स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली.

महाराष्ट्राला आजवर दर्जेदार वक्ते देणाऱ्या कविवर्य मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेचे विजेतेपद एचपीटी महाविद्यालय नाशिकच्या श्रृती अशोक बोरस्ते यांनी पटकावले. तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघाचे अवधूत भगवान पाटील आणि ऋषभ सुशील चौधरी वादविवाद स्पर्धेचे मानकरी ठरले. वक्तृत्वाचा कस लागणाऱ्या उस्फूर्त वक्तृत्व स्पर्धेचे विजेतेपद इचलकरंजीच्या नाईट कॉलेज ऑफ आर्टस एन्ड कॉमर्सच्या तेजस्विनी संजय पांचाळने पटकावले. कनिष्ठ महाविद्यालय विभागामध्ये टी.सी कॉलेजच्या अक्षय माणिक चौरे याला प्रथम क्रमांक मिळाला.

बारामती नगर परिषद आणि तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालय अशा दोन विभागांमध्ये ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेचे हे ४८ वे वर्ष आहे. विजेत्यांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

वक्तृत्व स्पर्धेतील मोरोपंत विषयातील वरिष्ठ विभागात बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटणचा अमृत बापू भिसे तर कनिष्ठ विभागामध्ये शारदाबाई पवार महिला महाविद्यालयाच्या वैष्णवी गोरख कापरे हीने प्रथम क्रमांक मिळवला. महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील ४७ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे परीक्षण डॉ. दिपाली जाधव, डॉ. विलास बुवा, डॉ. अशोक शिंदे, डॉ. निलेश जाधव आणि डॉ. शोभा तितर यांनी केले. कविवर्य मोरोपंत स्पर्धेच्या समारोपाच्या कार्यक्रमामध्ये स्पर्धेच्या कार्याध्यक्षा डॉ. रंजना नेमाडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ सुनिल खामगळ यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मेधा बडवे यांनी केले. या उपक्रमामध्ये अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री.जवाहर शहा व संस्थेचे सचिव श्री.मिलिंद शहा यांचे विशेष योगदान होते. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांचे कार्यक्रमास मार्गदर्शन लाभले

Chaturchand College Library Baramati

दैनिक सकाळ दि. 28/1/2022 पान.नं. 8

# ओंकार वाघोले याचा पंतप्रधान रॅलीत सहभाग



ओंकार वाघोले

**बारामती** : तुळजाराम चतुरचंद महाविद्याल यातील राष्ट्रीय छात्र सेनेचा (एन.सी.सी.) विद्यार्थी सिनिअर अंडर ऑफिसर ओंकार वाघोले याची दिल्ली येथील आर. डी. सी. कॅम्पसाठी निवड झाली होती. या परेडमध्ये सहभागी होत त्याने पंतप्रधान रॅलीमध्येही सहभाग नोंदवला. ओंकार याची महाविद्यालयीन स्तरावर आरडीसी कॅम्पसाठी निवड करण्यात आली. पुण्यात टेबल ड्रिलमध्ये त्याने सुवर्णपदक प्राप्त केले. त्यातूनच पुढच्या कॅम्पसाठी त्याची निवड झाली. आरडीसी कॅम्प सिलेक्शन साठी कॅट-१ कॅट -२, कॅट -३ आणि कॅट-४ या कॅम्प निवड प्रक्रियामधून दिल्ली येथे होणाऱ्या रिपब्लिक-डे कॅम्पसाठी निवड झाली. एन.सी.सी अधिकारी लेफ्टनंट विवेक बळे यांनी त्याला मार्गदर्शन केले. या यशाबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी अभिनंदन केले. Sakal 28/1/22

दैनिक 'सकाळ' दि. २९/९/२०२२ पान नं. ४

# टीसी महाविद्यालयात व्याख्यान

**बारामती, ता. २८ :** लोकांच्या अपेक्षा पूर्ण करणारे लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी मतदारांमध्ये मतदानाविषयी जागृती करणे हे सुदृढ लोकशाहीसाठी गरजेचे आहे, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी दादासाहेब कांबळे यांनी केले.

'आझादी का अमृत महोत्सव' या उपक्रमाअंतर्गत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने 'सर्वसमावेशक, सुलभ आणि सहभागपूर्ण निवडणुका' या विषयावर ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कांबळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर होते. लोकशाही सुदृढ करण्यासाठी नवमतदार असलेल्या विद्यार्थ्यांनी मतदार यादीत नाव नोंदणी केली पाहिजे, असे आवाहन कांबळे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

डॉ. मुरूमकर म्हणाले, ''भारतीय लोकशाहीची वीण अतिशय सुदृढ आहे. भारतीय मतदार जागृत आहे. जगात सर्वात जास्त तरुणाई भारतामध्ये आहे. त्यामुळे भारतीय लोकशाही अधिक सुदृढ करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने मतदान केले पाहिजे.''

या प्रसंगी व्याख्यानाचे संयोजक डॉ. हनुमंत फाटक, महाविद्यालयाचे उपप्राचार्य, रजिस्ट्रार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू पांडे यांनी केले.

दैनिक पुढारी दि. २८/१/2022 पान नं. ५



# मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेत नाशिकची श्रुती बोरस्ते प्रथम

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व बारामती नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४८व्या कविवर्य मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेत नाशिकच्या एचपीटी महाविद्यालयाच्या श्रुती अशोक बोरस्ते हिने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघाचे अवधूत भगवान पाटील आणि ऋषभ सुशील चौधरी वादविवाद स्पर्धेचे मानकरी ठरले. वक्तृत्व स्पर्धेचे विजेतेपद इचलकरंजीच्या नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सच्या तेजस्विनी संजय पांचाळने पटकावले. कनिष्ठ महाविद्यालय विभागामध्ये टी. सी. कॉलेजच्या अक्षय माणिक चौरे याला प्रथम क्रमांक मिळाला.

वक्तृत्व स्पर्धेत मोरोपंत विषयात वरिष्ठ विभागात बाळासाहेब देसाई महाविद्यालय पाटणचा अमृत बापू भिसे, तर कनिष्ठ विभागामध्ये शारदाबाई पवार महिला महाविद्यालयाच्या वैष्णवी गोरख कापरे हिने प्रथम क्रमांक मिळविला. स्पर्धेचे परीक्षण डॉ. दीपाली जाधव, डॉ. विलास बुबा, डॉ. अशोक शिंदे, डॉ. नीलेश जाधव आणि डॉ. शोभा तितर यांनी केले.

स्पर्धेच्या कार्याध्यक्षा डॉ. रंजना नेमाडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. मेधा बडवे यांनी केले. डॉ. सुनील खामगळ यांनी आभार व्यक्त केले. या उपक्रमामध्ये अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शहा व संस्थेचे सचिव मिलिंद शहा यांचे विशेष योगदान होते. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांचे कार्यक्रमास मार्गदर्शन लाभले.

४ पुढारी मंगळवार, २५ जानेवारी २०२२

# टी.सी. महाविद्यालयात आरोग्य जागृती कार्यशाळा

बारामती : पुढारी वृत्तसेवा

भारतभर साज-या होत असलेल्या;आझादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत येथील टी. सी. महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, निरामय मेडिकल फाउंडेशन व रिसर्च सेंटर बारामती आणि राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य जागृती कार्यशाळा पार पडली.

या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, डॉ. प्रा. रंजना नेमाडे व डॉ. अशोक देशपांडे यांच्या हस्ते झाले. डॉ. अशोक देशपांडे यांचे निरामय मेडिकल फाउंडेशन अ‍ॅण्ड रिसर्च व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त सामंजस्य करारांतर्गत गेल्या दहा वर्षांपासून विविध आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. नववर्षाचे निमित्त साधून महिलांमधील थायरॉईडचे वाढते प्रमाण पाहता थायरॉईडचे योग्यवेळी निदान व्हावे व वेळीच उपचार घेतले जावेत या उद्देशाने यावेळी इतर तपासण्यांबरोबरच थायरॉईड तपासणी देखील केली गेली. या कार्यशाळेत संस्था व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सेवक, सेविका यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्यात आली. यासाठी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीने विशेष परिश्रम घेतले. उत्तम आरोग्य राखण्यासाठी प्रशिक्षणही देण्यात आले. थायरॉईड, मधुमेह नियंत्रण, हिमोग्लोबीन वाढ यासाठी समतोल आहार व व्यायाम याविषयी जागृती करण्यात आली. या उपक्रमामध्ये अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शहा व सचिव मिलिंद शहा यांचे विशेष योगदान होते. सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनील पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, रुसा समन्वयक अजित तेळवे, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार यांचे कार्यशाळेसाठी मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेत महाविद्यालय परिवारातील १०३ महिला आणि ८४ पुरुषांनी यात सहभाग घेतला.

# महाविद्यालये १ फेब्रुवारीपासून होणार सुरू; प्रवेश फक्त 'लसवंतांनाच'

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील शाळा सुरू करण्यापाठोपाठ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाविद्यालयेही ऑफलाइन सुरू करण्यास हिरवा कंदील दिला आहे. मात्र, लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच कॅम्पसमध्ये प्रवेश देण्याच्या सूचना सरकारने दिल्या आहेत.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी ट्विट करून ही माहिती दिली आहे. कोरोनामुळे मागील दोन वर्षांपासून शाळा आणि सर्वप्रकारची महाविद्यालये बंद आहेत. विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात होत असलेले शैक्षणिक नुकसान व कोरोनामुळे निर्माण झालेली परिस्थिती हळूहळू नियंत्रित असल्यामुळे सरकारने शाळा सुरू करण्याचे नुकतेच आदेश दिले होते.

सोमवारपासून राज्यातल्या शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. रुग्णसंख्या कमी असलेल्या ठिकाणी खबरदारी घेऊन विद्यार्थ्यांच्या उपस्थितीला परवानगी देण्यात आली आहे. शाळाबाबत निर्णय झाल्यानंतर महाविद्यालय सुरू करण्याबाबत उदय सामंत यांनी मुख्यमंत्र्यांपुढे प्रस्ताव ठेवला होता. आता त्या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिली असल्याची माहिती सामंत यांनी ट्विटरद्वारे दिली. कोरोना नियमांचे काटेकोर पालन करूनच महाविद्यालय सुरू करा, अशा सूचना त्यांनी शैक्षणिक संस्थांना केल्या आहेत.

मा. प्राचार्य साहेब

दै. पुढारी दि. 25/1/2022 पान. नं. ४

# टी.सी. महाविद्यालयात आरोग्य जागृती कार्यशाळा

बारामती : पुढारी वृत्तसेवा

भारतभर साज-या होत असलेल्या;आझादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत येथील टी. सी. महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, निरामय मेडिकल फाउंडेशन व रिसर्च सेंटर बारामती आणि राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य जागृती कार्यशाळा पार पडली.

या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, डॉ. प्रा. रंजना नेमाडे व डॉ. अशोक देशपांडे यांच्या हस्ते झाले. डॉ. अशोक देशपांडे यांचे निरामय मेडिकल फाउंडेशन अँण्ड रिसर्च व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त सामंजस्य करारांतर्गत गेल्या दहा वर्षांपासून विविध आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. नववर्षाचे निमित्त साधून महिलांमधील थायरॉईडचे वाढते प्रमाण पाहता थायरॉईडचे योग्यवेळी निदान व्हावे व वेळीच उपचार घेतले जावेत या उद्देशाने यावेळी इतर तपासण्यांबरोबरच थायरॉईड तपासणी देखील केली गेली. या कार्यशाळेत संस्था व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सेवक, सेविका यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्यात आली. यासाठी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीने विशेष परिश्रम घेतले. उत्तम आरोग्य राखण्यासाठी प्रशिक्षणही देण्यात आले. थायरॉईड, मधुमेह नियंत्रण, हिमोग्लोबीन वाढ यासाठी समतोल आहार व व्यायाम यांविषयी जागृती करण्यात आली. या उपक्रमामध्ये अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शहा व सचिव मिलिंद शहा यांचे विशेष योगदान होते. सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनील पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, रुसा समन्वयक अजित तेळवे, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार यांचे कार्यशाळेसाठी मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेत महाविद्यालय परिसरातील १०३ महिला आणि ८४ पुरुषांनी यात सहभाग घेतला.

दै. पुढारी 25/1/22 पान ४

Tuljaram Chaturchand College Library Baramati

ABS
25/1/1

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College,

(Arts, Science and Commerce),
Baramati Dist:-Pune – 413 102(M.S.)
Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune
Autonomous
Religious Minority Institution
Website- www.tccollege.org E_mail- principal.tccollege@gmail.com Phone No. (02112) 222405 / 223635

## REQUIRED

Applications are Invited from Eligible Candidates for the Full Time **Grantable Principal** Post.

| Name of the Post | No. of Post | Reservation |
|---|---|---|
| Principal | 01 | Open to all |

1) Educational Qualification, Experience, Pay Scale etc. applicable for the post are as per norms specified by UGC, Government of Maharashtra Resolution dated 08 March, 2019 and 10 May,2019 and Savitribai Phule Pune University, Pune as modified from time to time.
2) Candidates applying for post of Principal should submit their verified API – as per UGC 5th Notification, dated 18th July, 2018 (Academic Performance Indicator) certificate from Savitribai Phule Pune University, Pune with all documents along with application form.
3) The appointment to the post of Principal will be for tenure of five years from the date of appointment or up to attainment of superannuation, whichever is earlier.
4) T.A./D.A. will not be paid for attending the Interview.
5) Application must be enclosed with the certified Photo copy of the original documents pertaining to Educational qualifications.
6) Incomplete applications and application received after the last date will not be considered. The Institute / College will not be responsible for postal delay, if any.
7) Application along with all the necessary documents should reach within 15 days from date of Publication of this advertisement. to The Secretary, Anekant Education Society, (T. C. College Campus) Post Box No. 51, Baramati Dist. Pune – 413 102 (M.S.)
8) Any type of unnecessary communication with institute, college or concerned authorities or recommendations from any other persons favoring or influencing the selection procedure will be treated as disqualification and candidature of concerned applicant will be rejected at any stage.
9) This advertisement is made as per No Objection Certificate from Jt. Director (Higher Education), Pune Region, Pune vide letter No. JDHEPune/NOC/2019/35, dated 20-12-2019.
10) Preference will be given to 'Jain' Religious Candidate.

Secretary
Anekant Eduacation Society, Baramati

Chaturchand ... Library

दै. पुढारी - दि - २७।१।२०२२ - पा. नं - ६ (माझा जिल्हा)

# अंजनगाव येथे टी. सी. कॉलेजचे श्रमसंस्कार शिबिर

## लसीकरण मोहिमेवर लक्ष, पथनाट्यातून जनजागृती

**सुपे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, राष्ट्रीय सेवा योजना व अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी वसुंधरा, माझ गाव कोरोनामुक्त गाव' या उपक्रमांतर्गत शासनाने दिलेल्या कोविड नियमांचे काटेकोरपणे पालन करीत १६ जानेवारी ते २२ जानेवारी या कालावधीत बारामती तालुक्यातील अंजनगाव येथे श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



**श्रमदान करताना तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिरार्थी.**

या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या हस्ते झाले. या शिबिरात वृक्षलागवड, तसेच ग्रामस्थांना लस घेण्यासाठी प्रवृत्त करणे, दंतचिकित्सा, संपूर्ण आरोग्य तपासणी, कोविडविषयी जनजागृती यावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः गावामध्ये औषध फवारणी केली. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज खोमणे यांनी कोविडविषयी घ्यावयाची काळजी या विषयावर मार्गदर्शन केले.

हे उपक्रम प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अंजनगाव ग्रामस्थ यांच्या सहकार्याने घेत आहोत, असे कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास कर्डिले म्हणाले. कार्यक्रम अधिकारी प्रा. वैभव लांडगे, डॉ. संदीप तापकीर, डॉ. विठ्ठल नाळे, प्रा. प्रकाश फुलारी, शैलेजा जाधव, अस्मिता भगत, सरपंच सविता परकाळे, उपसरपंच सुभाष वायसे, दिलीप परकाळे, मिलिंद मोरे, नवनाथ परकाळे, सुरेश परकाळे, सुभाष परकाळे, प्रदीप वायसे, वैभव मोटे, ग्रामसेविका मिनाज मुलाणी यांचे विशेष सहकार्य शिबिरासाठी मिळाले.

अनेक लोक अजूनही लस घेत नाहीत. लस घेण्याविषयीचे अनेक गैरसमज आहेत. यासंदर्भात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे स्वयंसेवक पथनाट्यातून जनजागृती करीत आहेत. अंजनगाव येथे चिंचबन साकारण्यात येणार आहे. त्याअंतर्गत चिंचेच्या ३५० झाडांची लागवड करण्यात आली आहे.

Chaturchand Co

मा. प्राचार्य साहेब

दै. सकाळ दि. 29/9/2022 पान नं. 5 (पुणे जिल्हा)

# टीसी महाविद्यालयात आरोग्य जागृती कार्यशाळा

**बारामती, ता. २० :** आजादी का अमृत महोत्सवानिमित्त टी. सी महाविद्यालयातील, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, बारामती येथील निरामय मेडिकल फाउंडेशन व रिसर्च सेंटर आणि नवी दिल्ली येथील राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) यांच्या वतीने आयोजित आरोग्य जागृती कार्यशाळेत महाविद्यालयातील १०३ महिला आणि ८४ पुरुषांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेचे उद्‍घाटन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, डॉ. रंजना नेमाडे व डॉ. अशोक देशपांडे यांच्या हस्ते झाले.



**बारामती : आरोग्य शिबिराचे उद्‍घाटन करताना डॉ. रंजना नेमाडे. रजिस्ट्रार अभिनंदन शहा आणि इतर मान्यवर.**

डॉ. अशोक देशपांडे यांचे निरामय मेडिकल फाउंडेशन ॲण्ड रिसर्च व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या सामंजस्य करारांतर्गत गेल्या दहा वर्षांपासून विविध आरोग्य शिबिरे राबवली जातात. महिलांमधील थायरॉईडचे वाढते प्रमाण पाहता थायरॉईडचे योग्यवेळी निदान व्हावे व वेळीच उपचार घेतले जावेत या उद्देशाने यावेळी इतर तपासण्यांबरोबरच थायरॉईड तपासणी देखील केली गेली. या कार्यशाळेत संस्था व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सेवक, सेविका यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. यासाठी अनेकांत एज्युकेशन सोसायटीने परिश्रम घेतले. उत्तम आरोग्य राखण्यासाठी प्रशिक्षणही देण्यात आले. थायरॉईड, मधुमेह नियंत्रण, हिमोग्लोबीन वाढ यासाठी समतोल आहार व व्यायाम याविषयी माहिती देण्यात आली. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शहा व संस्थेचे सचिव मिलिंद शहा यांचे योगदान लाभले. सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनील पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, अजित तेळवे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी या उपक्रमासाठी मार्गदर्शन लाभले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दै. पुढारी. दि- २१/१/२०२२. पा. नं- ३

# आजपासून वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा

**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व बारामती नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने गेली अनेक वर्षे सुरू असलेली कविवर्य मोरोपंत वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा यंदा शुक्रवार व शनिवारी (दि. २१ व २२ जानेवारी) ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. स्पर्धेचे हे ४८ वे वर्ष आहे. स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २१) होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय गटामध्ये वक्तृत्व स्पर्दा होणार आहेत. दुसऱ्या दिवशी वादविवाद आणि उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा होईल. स्पर्धेसाठी कनिष्ठ गटाला 'जैन धर्माचे वेगळेपण', 'शारदीय कंठमणी मोरोपंत', 'शेतकरी आंदोलन : माझे चिंतन', 'राजकारणाची ऐशीतैशी', 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' आणि 'मनोरंजनाचे नवे विश्व : माझा मोबाईल स्क्रिन' हे विषय देण्यात आले आहेत. वरिष्ठ गटासाठी 'मोरोपंतांच्या श्लोक केकावलीतील सौंदर्यस्थळे', 'राष्ट्रसंत तरुणसागर महाराज : एक क्रांतिकारी व्यक्तिमत्व', 'नवे शैक्षणिक धोरण : माझ्या अपेक्षा', 'सत्ताकारणातील उत्तरदायित्व', 'कोरोना : वैश्विक महागुरू', 'ऑनलाइन माध्यम : शिक्षणाचा नवा अविष्कार' आणि 'कला प्रवासातील बदलत्या शैली' हे विषय देण्यात आले आहेत. वाद-विवाद स्पर्धेसाठी 'भारताच्या स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीत भारतीय स्वतंत्र झाला आहे' या विषयाचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. विजेत्यांची नावे समारोप प्रसंगी जाहीर करण्यात येणार असून पारितोषिक वितरणाची तारीख नंतर कळविली जाणार असल्याचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व स्पर्धेच्या कार्याध्यक्षा डॉ. रंजना नेमाडे यांनी सांगितले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दै. सकाळ. दि- २१/१/२०२२. पा.नं-५.

# टीसी महाविद्यालयात आरोग्य जागृती कार्यशाळा

बारामती, ता. २० : आजादी का अमृत महोत्सवानिमित्त टी. सी महाविद्यालयातील, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, बारामती येथील निरामय मेडिकल फाउंडेशन व रिसर्च सेंटर आणि नवी दिल्ली येथील राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) यांच्या वतीने आयोजित आरोग्य जागृती कार्यशाळेत महाविद्यालयातील १०३ महिला आणि ८४ पुरुषांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, डॉ. रंजना नेमाडे व डॉ. अशोक देशपांडे यांच्या हस्ते झाले.

डॉ. अशोक देशपांडे यांचे निरामय मेडिकल फाउंडेशन अँण्ड रिसर्च व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या सामंजस्य करारांतर्गत गेल्या दहा वर्षांपासून विविध आरोग्य शिबिरे राबवली जातात. महिलांमधील थायरॉईडचे वाढते प्रमाण पाहता थायरॉईडचे योग्यवेळी निदान व्हावे व वेळीच उपचार घेतले जावेत या उद्देशाने यावेळी इतर तपासण्यांबरोबरच थायरॉईड तपासणी देखील केली गेली. या कार्यशाळेत संस्था व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सेवक, सेविका यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. यासाठी अनेकांत एज्युकेशन सोसायटीने परिश्रम घेतले. उत्तम आरोग्य राखण्यासाठी प्रशिक्षणही देण्यात आले. थायरॉईड, मधुमेह नियंत्रण, हिमोग्लोबीन वाढ यासाठी समतोल आहार व व्यायाम याविषयी माहिती देण्यात आली. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शहा व संस्थेचे सचिव मिलिंद शहा यांचे योगदान लाभले. सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनील पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, अजित तेळवे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी या उपक्रमासाठी मार्गदर्शन लाभले.



बारामती : आरोग्य शिबिराचे उद्घाटन करताना डॉ. रंजना नेमाडे. रजिस्ट्रार अभिनंदन शहा आणि इतर मान्यवर.

Chaturchand Co

मा. प्राचार्य साहेब

दैनिक लोकमत दि. 20/1/2022 पान नं. 3



अंजनगाव येथे श्रमदान करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक.

# टीसी महाविद्यालयाचे श्रम संस्कार शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती** : अंजनगाव येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व राष्ट्रीय सेवा योजना व अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा व माझं गाव, कोरोनामुक्त गाव या उपक्रमांतर्गत १६ जानेवारी ते २२ जानेवारी या कालावधीत श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांच्या हस्ते झाले.

या शिबिरात वृक्ष लागवड, चिंचेच्या ३५० झाडांची लागवड, तसेच ग्रामस्थांना लस घेण्यासाठी प्रवृत्त करणे, दंत चिकित्सा, संपूर्ण आरोग्य तपासणी, कोविडविषयी जनजागृती करणे यावर जास्त भर देण्यात आला आहे विद्यार्थ्यांनी पाठीवर पंप घेऊन स्वत: गावामध्ये औषधाची फवारणी केली. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज खोमणे यांनी कोविडविषयी घ्यावयाची काळजी या विषयावर मार्गदर्शन केले. अशा अनेक तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले आहे.

कार्यक्रम अधिकारी प्रा. वैभव लांडगे हे विद्यार्थ्यांना काम करायला स्फूर्ती देत आहेत. डॉ. संदीप तापकीर, डॉ. विठ्ठल नाळे, प्रा. प्रकाश फुलारी, शैलेजा जाधव, अस्मिता भगत, सरपंच सविता परकाळे, उपसरपंच सुभाष वायसे, दिलीप परकाळे, मिलिंद मोरे, नवनाथ परकाळे, सुरेश परकाळे, प्रदीप वायसे, वैभव मोटे, ग्रामसेविका मिनाज मुलाणी यांचे विशेष सहकार्य मिळले

20/1/2022 लोकमत पान-3

ABS
21.1.

सकाळ १३/१/२२ पान ६

## टीसी महाविद्यालयास बेसबॉलमध्ये विजेतेपद

**बारामती :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने मुलांच्या आंतर महाविद्यालयीन बेसबॉल स्पर्धा येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय येथे नुकत्याच झाल्या. त्यात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले. या स्पर्धेत बारामती व दौंडच्या दोन संघासह, इंदापूर, पुण्यातील सांगवी या सहा संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संघाचा पहिला सामना दौंडच्या के. जी. कटारिया महाविद्यालयाविरुद्ध झाला. हा सामना टीसी महाविद्यालयाने चौदाविरुद्ध शून्य गुणांनी जिंकला. अंतिम सामना इंदापूरच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय संघाबरोबर झाला. हा सामना पाचविरूद्ध एक गुणांनी जिंकला. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामतीच्या संघाने संतोष कचरे, विजय महाडीक, स्वप्नील नरुटे, विशाल गोल्डे, अमित राऊत, स्वरूप भुजबळ, चैतन्य कट्टे, आकाश व्हने, रमेश गिरमकर, संदीप सावंत आणि श्रीकांत सपकाळ या सर्वांच्या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर विजेतेपद प्राप्त केले. या संघास डॉ. गौतम जाधव व अशोक देवकर यांचे मार्गदर्शन लाभले. मुली व मुले यांच्या विजयी व उपविजयी कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शहा, संस्थेचे सचिव मिलिंद शहा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी अभिनंदन केले.

सकाळ १३/१/२२

दै. सकाळ

सोमवार, ३ फेब्रुवारी २०२० ८

# टीसी महाविद्यालयामध्ये 'निर्भय कन्या' कार्यशाळा

बारामती, ता. २ : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'निर्भय कन्या' कार्यशाळा घेण्यात आली. "समाजात महिला व मुली सुरक्षित असल्या पाहिजेत. ज्या समाजात महिला सुरक्षित असतील, तो समाज निकोप असल्याचे ते एक लक्षण असते, महिलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी समाजाची असते," असे प्रतिपादन स्त्रीमुक्ती संघटनेच्या अलका पावनगडकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वतीने कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. 'मुलींची सुरक्षितता' हा कार्यशाळेचा विषय होता. उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. या कार्यशाळेत पावनगडकर, 'बायजा' मासिकाच्या संपादक डॉ. लतिका जाधव; तसेच पोलिस विभागाच्या निर्भया पथकाच्या अमृता भोईटे यांनी मार्गदर्शन केले.

दरम्यान, या वेळी अमृता भोईटे यांनी विद्यार्थिनींना महिलांविरोधातील होणाऱ्या गुन्ह्यांच्या विविध बाजू उलगडून दाखविल्या; तसेच अत्याचारविरोधातील कायदेशीर तरतुदी, भारतीय दंड संहितेची कलमे, निर्भया पथकाच्या कार्यप्रणाली याबद्दल माहिती दिली. अखेरच्या सत्रात नटराज नाट्य कला मंडळाच्या वतीने 'ब्लॅक रोझ' ही एकांकिका सादर करण्यात आली. ॲसिड हल्ल्याची शिकार झालेल्या लक्ष्मी आगरवाल यांच्या जीवनसंघर्षावर ही एकांकिका आधारित आहे.

कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत ६६० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. कार्यशाळा समन्वयक डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भगवान माळी यांनी आभार मानले.

सोमवार, ३ फेब्रुवारी २०२० MY पुणे जिल्हा दक्षिण पुढारी ५



निर्भय कन्या कार्यशाळेत अलका पावनगडकर यांचा सत्कार करताना डॉ. सीमा नाईक-गोसावी व इतर.

# 'सुरक्षित महिला हेच निकोप समाजाचे लक्षण'

## टी. सी. महाविद्यालयात निर्भय कन्या कार्यशाळा

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

सुरक्षित महिला हेच निकोचे लक्षण असल्याचे प्रतिपादन पुण्याच्या स्त्री मुक्ती संघटनेच्या अलका पावनगडकर यांनी व्यक्त केले.

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात निर्भय कन्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्याच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ व महाविद्यालय यांच्या संयुक्तपणे मुलींची सुरक्षितता या विषयावर हा कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले.

कार्यशाळेमध्ये अलका पावनगडकर, डॉ. लतिका जाधव, निर्भया पथकाच्या अमृता भोईटे आदींनी मार्गदर्शन केले. पावनगडकर यांनी खंबीर होवू निर्भय बनू या विषयावर विद्यार्थिनींशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या, स्त्रीला तिच्या स्त्रित्वावर हल्ला होईल याची सर्वाधिक भिती असते. मुली जोपर्यंत न्याय व समता यांचे अर्थ व महत्त्व समजून घेत नाहीत तोपर्यंत त्यांचा आत्मविश्वास वाढणार नाही. मुली अथवा महिलांवर होणार अत्याचार, हिंसा यामध्ये जवळचीच व्यक्ति असते. एकेकट्याने निर्भय होतानाच समुहाने निर्भय होणे गरजेचे असल्याचे त्या म्हणाल्या.

डॉ. लतिका जाधव यांनी 'युवतींवरील आव्हाने' या विषयावर विद्यार्थिनींशी संवाद साधला. बारामती निर्भया पथकाच्या अमृता भोईटे यांनी विद्यार्थीनींना महिलांविरोधातील होणाऱ्या गुन्ह्यांच्या विविध बाजू उलगडून दाखविल्या. तसेच अत्याचार विरोधातील कायदेशीर तरतुदी, भारतीय दंड संहितेचे वेगवेगळे कलम, निर्भया पथकाच्या कार्यप्रणाली बद्दल माहिती दिली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, डॉ. रंजना नेमाडे, रुक्मिणी लोणकर उपस्थित होते.

कार्यशाळेत विद्याप्रतिष्ठानचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, बारामती व विद्या प्रतिष्ठानचे सुप कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थिनींना सहभागी झाल्या होत्या. प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी केले. डॉ. भगवान माळी यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ दि. ८/०२/२०२० पान नं. ५ (पुणे जिल्हा)

# टीसी कॉलेजमध्ये वेटलँड दिन उत्साहात

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ यांच्या वतीने जागतिक वेटलँड दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अजित तेळवे यांचे 'कोस्टल वेटलँड अँण्ड बायोडायव्हर्सिटी' विषयावर विशेष व्याख्यान झाले. आपल्या आजूबाजूच्या वेटलँड अर्थात पाणस्थळ जागा आणि त्यांचे महत्त्व याविषयी तेळवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी ते म्हणाले, ''इराण येथील रामसारमध्ये २ फेब्रुवारी १९७१ रोजी झालेल्या करारानुसार पाणस्थळ जागेवरील जैवविविधता संवर्धनासाठी सहभागी देशांनी ठराव मंजूर झाला होता. यामुळेच २ फेब्रुवारी हा दिवस जागतिक वेटलँड दिन म्हणून जगभर साजरा करण्यात येतो.'' महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी अध्यक्षीय भाषण केले. डॉ. सीमा गोसावी-नाईक यांनी स्वागत केले. डॉ. एस. जे. चव्हाण यांनी परिचय करून दिला. या कार्यक्रमास डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. विलास कर्डिले यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अमृता चव्हाण यांनी केले. या वेळी छायाचित्र व पोस्टर प्रदर्शन आयोजित केले होते. पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख सूरश्री सोनवणे, हर्शल वांगीकर, सौरभ चंदनकर, गणेश पवार, सुजित वाघ यांनी सहकार्य केले.

दैनिक सकाळ दि. ८/०२/२०२० पान नं. ८ (पुणे जिल्हा)

[5501]-3057

# रामचंद्र जगताप यांना पीएच.डी. प्रदान



**बारामती,** ता. ७ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील योगा विभागाचे अध्यापक रामचंद्र दादाराम जगताप यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या पीएच.डी. प्रबंधाचा विषय 'इफेक्ट ऑफ योगा थेरपी ऑन फिजिकल अँड मेंटल हेल्थ ऑफ वूमन' हा होता.

चिंचोलीच्या कला व विज्ञान महाविद्यालयातील डॉ. यू. एस. गायकवाड यांनी शोधनिर्देशक म्हणून त्यांना मार्गदर्शन केले. डॉ. जगताप हे महाविद्यालयात गेल्या २२ वर्षांपासून अध्यापन करीत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या योगा [illegible] आणि [illegible] अभ्यासमंडळावर सदस्य म्हणून ते कार्यरत आहेत.

दैनिक पुढारी दि. ८/०२/२०२० पान नं. ५ (MY पुणे जिल्हा आवृत्ती)

# प्रा. रामचंद्र जगताप यांना पीएच.डी.



**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील योगा विभागातील प्रा. रामचंद्र दादाराम जगताप यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. मानसशास्त्र विभाग, आर्ट्स अँण्ड सायन्स कॉलेज, चिंचोली येथील डॉ. यू. एस. गायकवाड यांनी शोधनिर्देशक म्हणून त्यांना मार्गदर्शन केले. डॉ. जगताप हे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात गेल्या २२ वर्षांपासून अध्यापन करीत आहेत. तसेच, त्यांनी राष्ट्रीय व राज्यस्तरावरील विविध परिषदांमध्ये सहभागी होऊन संशोधन प्रबंध सादर केलेले आहेत. विविध योग कार्यशाळांचे आयोजन त्यांनी केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या योगा एज्युकेशन आणि स्पोर्ट कल्चर अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून ते कार्यरत आहेत. या यशाबद्दल त्यांचे संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा (सराफ), सचिव जवाहर शाह (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर आदींनी अभिनंदन केले.

Chatur... Library ...mati

मा. प्राचार्य साहेब

दैनिक पुढारी दि. ०/०२/२०२० पान नं. ८ (M4, पुणे जिल्हा)

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात पाणथळ जागांबाबत मार्गदर्शन

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात जागतिक वेटलँड (पाणथळ) दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अजित तेळवे यांचे 'कोस्टल वेटलँड अँण्ड बायोडायव्हर्सिटी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजिण्यात आले होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि महाविद्यालय यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. या व्याख्यानात डॉ. तेळवे यांनी आपल्या आजूबाजूच्या वेटलँड अर्थात पाणस्थळ जागा आणि त्यांचे महत्त्वाबाबत मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, इराण येथील रामसारमध्ये २ फेब्रुवारी १९७१ मध्ये झालेल्या करारानुसार पाणस्थळ जागेवरील जैवविविधता संवर्धनासाठी सहभागी देशांनी ठराव मंजूर झाला होता. यामुळेच २ फेब्रुवारी हा दिवस जागतिक वेटलँड दिन म्हणून साजरा होतो.

पाणस्थळ जमिनी या प्रामुख्याने दोन प्रकारच्या असून त्या गोडे पाणी व खारे पाणी अशा विभागल्या जातात. प्रत्येक पाणस्थळ जागेत



वेटलँड दिनानिमित्त बोलताना डॉ. अजित तेळवे.

अनेक प्रकारचे जीव रहिवास करत असतात. कोस्टल वेटलँड अर्थात समुद्र किनाऱ्यावरील पाणस्थळ जागा या निसर्गातील अत्यंत महत्वाचा घटक आहेत. किनारी प्रदेशात खारफुटी वनस्पती अर्थात मँग्रुव्हज महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असतात. त्सुनामी वेळी या वनस्पतींचा अत्यंत महत्त्वपूर्ण उपयोग होतो. शिवाय या वनस्पतीच्या मुळाशी विविध मासे प्रजननासाठी अंडी घालतात. या कोस्टल वेटलँडमध्ये जगभरात ६७ तर महाराष्ट्रात २७ वनस्पतींच्या प्रजाती आढळतात. महाराष्ट्राच्या कोस्टल वेटलँडमध्ये संशोधनादरम्यान डॉ. तेळवे यांना ६० ते ७० प्रकारचे पक्षी तसेच ३० ते ४० प्रकारचे कीटक भक्ष आढळले. १९३० साली मापडेंच्या अभ्यासानंतर या मँग्रुव्हज प्रजातीबद्दल माहिती मिळाली होती. त्यानंतर २००१ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासगटात डॉ. तेळवे यांनी ही प्रजात पुन्हा नव्याने शोधली.

उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी पर्यावरणाचे माणसाच्या आयुष्यातील महत्वाबद्दल मार्गदर्शन केले. माणूस म्हणून आपण निसर्गाला बाजूला करत स्वकेंद्री सभोवताल बनवतो. यामुळे पर्यावरणाला आणि जैवविविधततेला आपण धोक्यात घातले आहे. पर्यावरण आणि जैवविविधतता संवर्धन ही प्रत्येक व्यक्तीची नैतिक जबाबदारी असून हेच आपण आपल्या पुढच्या पिढीला देणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी मांडले.

याप्रसंगी छायाचित्र प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले होते. यासाठी पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुरश्री सोनवणे, वनस्पतिशास्त्र विभागातील प्रा. हर्शल वांगीकर, प्रा. सौरभ नंदनकर, प्रा. गणेश पवार, प्रा. सुजित वाघ यांनी सहकार्य केले. डॉ. सीमा गोसावी-नाईक यांनी प्रास्ताविक केले. अमृता चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विलास कर्डिले यांनी आभार मानले.

Tuljaram Chaturchand ...

१३/२/२०

मा. प्राचार्य साहेब

दैनिक पुढारी दि. 7/02/2020 पान नं. 5 (MY पुणे जिल्हा दक्षिण)

# सूत्रसंचालक अष्टावधानी असावा

## प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज यांचे मत

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

सध्या मार्केटिंगच्या व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात विविध कलागुण अंगी असणारा सूत्रसंचालक असणे गरजेचे आहे. सूत्रसंचालक अष्टावधानी असावा, असे प्रतिपादन भिगवणच्या कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज यांनी केले.



**सूत्रसंचालन कार्यशाळेप्रसंगी प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज यांचा सत्कार करताना उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर.**

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात मराठी विभाग व उद्योजकता विकास केंद्रांतर्गत एक दिवसीय सूत्रसंचालन कार्यशाळा पार पडली. यावेळी त्यांनी सूत्रसंचालन- एक कला या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यशाळेचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी केले.

प्राचार्य डॉ. वाळुंज म्हणाले, सूत्रसंचालक हा अष्टावधानी असावा. त्याचे वाचन चौफेर असावे. जीवनाकडे सकारात्मकतेने बघणारा, नवीन ऐकण्यासाठी कान आतूर असणारा, स्वागतशील, विवेकी, संवेदनशील वृत्तीचा, सहृदयी, खिलाडू वृत्तीचा, श्रोत्यांची नस ओळखणारा उत्कृष्ट सूत्रसंचालक होऊ शकतो.

ते पुढे म्हणाले की, सूत्रसंचालन ही प्रयत्नसाध्य कला असून सूत्रसंचालकाने शब्दार्थांच्या खोलीकडे लक्ष द्यावे. कार्यक्रम हा श्रोत्यांसाठी असतो याचे भान ठेवावे. सूत्रसंचालकाकडे बहुविध गुणांची शिदोरी असेल तर अनेक क्षेत्रांत उद्योजकतेच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्वरनाद प्रॉडक्शनचे प्रमुख कुमार देवकाते यांनी सूत्रसंचालनाचे विविध प्रकार या विषयावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालनामध्ये देहबोली, चेहेऱ्यावरील हावभाव, शब्दचातुर्य, शब्दसंपत्ती, वाचन, हजरजबाबीपणा, मितभाषी व्यक्तीला बोलते करता येणे, आवाजातील मृदुता, संयमी व्यक्तिमत्त्व, समयसूचकता, समर्पित वृत्ती, आवाजातील उठावदारपणा, स्वतःला विसरण्याची क्षमता, संपादनकौशल्य, ऑडिओ-व्हिडिओ, लोकसंग्रह व लोकसंपर्क वृत्ती, भावाभिव्यक्ती इ. गुणांचे उपयोजन करता येते. मुलाखत, जाहिरात, मोबाईल, यू-ट्यूब, रेडिओ, माहितीपट इ. माध्यमांमध्ये काम करण्याच्या संधींविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. गाडेकर म्हणाले, सूत्रसंचालक हा कोणत्याही भाषेचा असो तो वक्ता व श्रोता यांच्यामधील दुवा असतो. माध्यमांमधील रोजगाराच्या अनेक संधी सूत्रसंचालकाने शोधल्या पाहिजेत. उपस्थितांचे स्वागत डॉ. रंजना नेमाडे यांनी केले. समन्वयक डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी आभार मानले. डॉ. संदीप तापकीर, डॉ. मुक्ता आंभेरे, प्रा. राजकुमार तरडे यांनी कार्यशाळेचे नियोजन केले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati



तुळजाराम महाविद्यालयातील कार्यक्रमात डॉ. अनुपमा प्रभुणे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

# अनुवाद काळाजी गरज : डॉ. प्रभुणे

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

अनुवाद म्हणजे मूळ लेखकाचे भावविश्व दुसऱ्या भाषेतील वाचकांपर्यंत पोहोचविणे. त्यामुळे चांगला अनुवाद काळाजी गरज असल्याचे मत शारदानगरच्या हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. अनुपमा प्रभुणे यांनी व्यक्त केले.

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात हिंदी विभागांतर्गत सुरू करण्यात आलेल्या अनुवाद पदविका अभ्यासक्रमांतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्या बोलत होत्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, अनुवाद म्हणजे मूळ लेखकाचा भावविश्व दुसऱ्या भाषेत वाचकांपर्यंत पोहचवणे. सुयोग्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून चांगले अनुवादक निर्माण करणे काळाची गरज आहे. अनुवाद ही एक कला आहे. दिवसेंदिवस अनुवादाचे महत्त्व वाढत आहे. आपले स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करण्याची ही एक संधी आहे. या वेळी अनुवादासंदर्भात वेगवेगळी उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमांचे ज्ञान आत्मसात केले पाहिजे आणि त्याचा उपयोग अनुवादासाठी केला पाहिजे. अनुवादाचे विश्व विद्यार्थ्यांनी जाणून घेतले पाहिजे. नवा दृष्टीकोन ठेऊन अभ्यास केला पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रतिभा जावळे यांनी केले. तसेच हिंदी विभाग प्रमुख डॉ. प्रदीप सरवदे यांनी पाहुण्यांचे स्वागत आणि परिचय करून दिला.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा सराफ, सचिव जवाहर शहा वाघोलीकर यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन राहीन शेख यांनी केले. डॉ. संदीप पवार यांनी आभार मानले.

मा. प्राचार्य साहेब

दैनिक पुढारी दि. १०/०२/२०२० पान नं. ६.

# तुळजारामच्या प्रा. बळे यांना महानिर्देशक बॅटन, सुवर्णपदक

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे एनसीसी अधिकारी लेफ्टनंट प्रा. विवेक बळे यांना नागपूर येथे पार पडलेल्या एनसीसी अधिकारी प्रशिक्षण अकादमीमध्ये महानिर्देशक बॅटन व सुवर्णपदक मिळाले. या पदकामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. राज्यात गेल्या सहा वर्षांत एकाही एनसीसी अधिकाऱ्याला हा सन्मान मिळाला नव्हता. तो प्रा. बळे यांच्या रुपाने मिळाला.

लेफ्टनंट विवेक बळे यांची महाराष्ट्र बटालियन एनसीसी पुणे मधून प्री-कमिशन प्रशिक्षणासाठी निवड झाली होती. या प्रशिक्षणासाठी भारतातून निवडक ४५७ प्राध्यापक व शिक्षक विविध महाविद्यालये आणि शाळांमधून सहभागी झाले होते.

हे प्रशिक्षण दिनांक ४ नोव्हेंबर २०१९ ते १ फेब्रुवारी २०२० या कालावधीत झाले. ३ महिन्यांच्या कठोर प्रशिक्षण कार्यक्रमात शारीरिक शिक्षण, योग, परेड, नेतृत्व व व्यक्तिमत्त्व विकास, स्वच्छ भारत अभियान, डिजिटल इंडिया, आपत्ती व्यवस्थापन, सामाजिक जागरुकता आणि इतर अनेक लष्करी विषयांचा समावेश करण्यात आलेला होता.

शारीरिक शिक्षण, शस्त्रास्त्र प्रशिक्षण, शिकवण्याची क्षमता, नकाशा वाचन, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिर स्थापना, कमांडिंग ऑफिसर लाईक क्वालिटी इत्यादी



**प्रा. विवेक बळे यांचा सन्मान करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व अन्य.**

प्रकारात लेफ्टनंट बळे यांनी सर्वाधिक गुण प्राप्त करून पहिल्या दहा प्रशिक्षणार्थीमध्ये स्थान पक्के केले. पुढे शस्त्रास्त्र प्रशिक्षण, परेड, अध्यापन सराव परीक्षा व नंतर अधिकारी प्रशिक्षण अकादमी, कामटीचे कमांडंट मेजर जनरल आय.जे.एस. हुंडल यांच्या कन्फर्मेटरीमधून पहिल्या तीनमध्ये आपले स्थान निश्चित केले.

अखेरीस लेफ्टनंट बळे यांनी महानिर्देशक बॅटन व सुवर्णपदकासह प्रथम क्रमांक मिळवला. त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, संस्थेचे अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार व दोन महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर एन. पी. एस. मौर्या यांनी लेफ्टनंट विवेक बळे यांचे अभिनंदन केले.

पुढारी दि १०/२/२०२० पान नं ६,

ABS 12/2

मा.प्राचार्यसाहेब

दैनिक सकाळ दि. 22/02/2020 पान नं. 4

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात कार्यशाळा

**बारामती, ता. २१ :** गुणवत्तेच्या सर्वच पातळ्यांवर ग्रामीण परिसरातील महाविद्यालयांनीही उतरावे या उद्देशाने येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वतीने नुकतेच 'इंटरअॅक्टिव्ह रोल ऑफ फॅकल्टी अँड स्टुडंटस इन क्वालिटी अॅश्युरन्स' या विषयावरील दोन दिवसांच्या राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले गेले. नॅक मूल्यांकनासाठी आवश्यक गुणवत्ता सिद्धतेसाठी विद्यापीठ अनुदान आयोगांतर्गत टीसी महाविद्यालय प्रयत्नशील आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर कार्यशाळेचे निमंत्रक होते. पहिल्या सत्रात डॉ. भालचंद्र भोळे (रोल ऑफ मॅनेजमेंट इन क्वालिटी अॅश्युरन्स) दुसऱ्या सत्रात डॉ. भारत कानगुडे (फीडबॅक मेकॅनिझम इन क्वालिटी अॅश्युरन्स) तिसऱ्या सत्रात डॉ. रामदास पवार यांनी (यूज ऑफ आयसीटी इन टीचिंग अँड लर्निंग) या विषयावर मार्गदर्शन केले.




बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेतील मान्यवर.

दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात डॉ. पोपट तांबडे (लर्निंग आउटकम बेस्ड करिक्युलम फ्रेमवर्क) दुसऱ्या सत्रात डॉ. अय्युब शेख (इम्पॉर्टन्स ऑफ आउटरिच अॅक्टिव्हिटीज इन क्वालिटी अॅश्युरन्स) अखेरच्या सत्रात अजय भागवत यांनी (इंट्रोडक्शन टू आय. क्यू. ए. सी. सॉफ्टवेअर) या विषयावर मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार अभिनंदन शहा व इतर सदस्यांनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

सकाळ दि 22/2/2020 पान 4

मा. प्राचार्यसाहेब

साप्ताहिक रागिणी दि 26/02/2020 पान नं. 2

# आज राजभाषा दिनी रेडिओ रागिणी वरून मराठीचा जागर!

बारामती : 'ओळखलत का सर मला? - पावसात आला कोणी, कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी. क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून..., कणा सारख्या अनेक हृदयस्पर्शी व वास्तववादी परिस्थितीचे वर्णन करनाऱ्या कवितेचा अनमोल ठेवा रसिकांना देणारे कवी कुसुमाग्रज यांचा आज जन्मदिन सर्वत्र मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने रागिणी फाऊंडेशन संचलित रेडिओ रागिणीवरून कवी कुसुमाग्रज यांच्या कवितांचे रसग्रहण, सामाजिक व वास्तववादी साहित्य या बरोबरच मराठी या आपल्या मातृभाषेचे संवर्धन व महत्व, बोलीभाषेची भाषिक वैशिष्ट्ये, कवी मंगेश पाडगावकरांचे मराठी साहित्यातील योगदान, कवयित्री कल्पना दुधाळ यांच्या शेतकरी जीवनावर भाष्य करणाऱ्या कविता, कथालेखिका वर्षा देशपांडे यांचा साहित्यप्रवास, सामाजिक जडण-घडणीतील बोलीभाषचे स्थान, मराठी संवर्धनातील युवकांची भूमिका अशा अनेक गोष्टीवर प्रकाश टाकणाऱ्या कार्यक्रमांची निर्मिती करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे प्रसारण रेडिओ रागिणीवरून आज स.९ ते दु.३ या वेळेत करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमात तुळजाराम चतूरचंद महाविद्यालयातील मराठी विभागातील प्रा. डॉ.रंजना नेमाडे (मराठी विभाग प्रमुख), प्रा. डॉ सीमा नाईक -गोसावी, प्रा. डॉ सुनील खामगळ, प्रा डॉ. मुक्ता आंभेरे, प्रा. डॉ .संदीप तापकीर, प्रा राजकुमार तरडे यांच्या सह एम भाग १ व २.(मराठी), एफ.वाय. बी.ए, एम. एस्सी या वर्गातील विध्यार्थ्यांनी सहभाग दर्शवला. 'विद्यार्थ्यांना मराठी अभ्यासाची गोडी लागावी, लेखन कौशल्य, संहिता लेखन उत्कृष्टरित्या करता यावे, वाचन आणि सादरीकरण कौशल्य अधिकाधिक विकसित करता यावे. या उद्देशाने हा उपक्रम मराठी विभाग येथे राबविण्यात आल्याचे रेडिओ रागिणीच्या संचालिका राजश्री आगम यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी तुळजाराम चतुचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .चंद्रशेखर मुरूमकर यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे ध्वनिमुद्रण व्ही. शांताराम. स्टुडिओ, टी. सी. महाविद्यालय येथे करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या यशस्वी प्रसारणासाठी पूजा बोराटे व श्रुतिका आगम यांचे सहकार्य लाभले.

साप्ताहिक रागिणी दि 26/02/2020 पान नं. 8

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात संस्कृत मुलाखत संपन्न

बारामती : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात या शैक्षणिक वर्षात सुरु झालेल्या संस्कृत विभागामार्फत तेजस कुलकर्णी यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते.

या कार्यक्रमासाठी पुणे येथील संस्कृत अभ्यासक तसेच आधुनिक आणि पारंपारिक अर्थात गुरुकुल अशा दोन्ही पद्धतीने शिक्षण प्राप्त केलेले तेजस कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तेजस कुलकर्णी यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून गुरुकुल म्हणजे काय आहे ? गुरुकुल शिक्षण परंपरेतील वातावरण, आज देखील असे गुरुकुल अस्तित्वात आहेत का ?, गुरुकुलातील परीक्षा पद्धती कशा असतात?, प्राचीन भारतीय गणितशास्त्र म्हणजे काय आणि त्याचे आजच्या जगातील उपयोजन कसे करता येऊ शकते? अशा विविध प्रश्नांच्या माध्यमातून मुलाखतीचा कार्यक्रम संपन्न झाला.


या कार्यक्रमासाठी शिवळे महाविद्यालयाचे तत्वज्ञान विभागप्रमुख डॉ. सुनीलदत्त गवरे तसेच मुधोजी महाविद्यालय फलटणचे तत्वज्ञान विभागप्रमुख डॉ. नवनाथ रासकर हे देखील उपस्थित होते. तत्पूर्वी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे तत्वज्ञान विभाग प्रमुख प्रा. कृष्णात नगरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अनिरुद्ध किल्लेदार यांनी तर आभारप्रदर्शन स्वप्नाली मदने या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

ABS
5/27/21

पान नं.५

साप्ताहिक कऱ्हा वार्ता Weekly Karhawarta सोमवार दि.२ मार्च

# टी.सी.कॉलेजला मराठी राजभाषा दिन उत्साहात



बारामती:- येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कवी कुसुमाग्रज यांच्या कविता, लेखन साहित्य यांच्या आठवणी सादर केल्या. यामध्ये मी वाचलेले कवी कुसुमाग्रज' याविषयी मुलाखती घेऊन प्रसारित करण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी 'तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुहमकर यांचे मार्गदर्शन लाभले. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ.रंजना नेमाडे, प्रा.डॉ.सीमा नाईक गोसावी, प्रा.डॉ. सुनील खामगळ, प्रा.डॉ.मुक्ता भेरे, प्रा. डॉ.संदीप तापकीर, प्रा.राजकुमार ताडे व मराठी विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्या प्रतिष्ठान मराठी प्राथमिक शाळेत आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथदिंडीचे उद्घाटन विद्या प्रतिष्ठान इंग्रजी माध्यम शाळेतील मराठी विभाग प्रमुख मंजुषा सावंत व शाळेच्या मुख्याध्यापका रेखा शिंदे यांचे हस्ते करण्यात आले. ग्रंथदिंडीने पन्सिल चौकातील उपस्थित नागरिकांचे प्रबोधन करून त्यांना मराठी राजभाषा दिनाचे महत्त्व पटवून दिले. ग्रंथदिंडाच्या सोबतीला असणाऱ्या शाळेतील लेझीम पथकाने मराठमोळ्या संस्कृतीचा परिचय करून दिला. डोक्यावर भगवे फेटे घातलेल्या विद्यार्थ्यांनी ठिकठिकाणी लेझीमचे प्रात्यक्षिक सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. महाराष्ट्रातील ज्या महान व्यक्तींना भारतरत्न सन्मानाने गौरविण्यात आले. तसेच, मराठी साहित्य समृद्ध करणारे लेखक व कवी या सर्वांचे फोटे या ग्रंथदिंडीत विद्यार्थ्यांनी हातात घेतलेले होते.

आगरवाल विद्यालयात राजभाषादिनी विविध उपक्रम बारामती येथील आर.एस.आगरवाल टेक्निकल विद्यालयात मराठी राजभाषा दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून मंगलाताई बोरावके उपस्थित होत्या. मुख्याध्यापक राजेंद्र काकडे, उपमुख्याध्यापक अर्जुन मोहिते, पर्यवेक्षक विष्णू बाबर, आजीव सभासद बंडू पवार, आजीव सदस्य अर्जुन मलगुंडे यांच्या हस्ते कुसुमाग्रजच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. रोहिणी कुबेर यांनी बोरवके यांचे स्वागत केले. मराठी विभाग प्रमुख हरिश्चंद्र यादव यांचा सत्कार करण्यात आला. शब्द वेल या मराठी हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले. ९ वीच्या विद्यार्थिनींनी मराठी कविता गायन केले. कीर्ती काळे या विद्यार्थिनीने आपल्या भाषणात मराठी भाषेचे महत्त्व पटवून दिले. ऊर्मिला भोसले यांनी आभार मानले.

Tuljaram Chaturchand College * Baramati * Library

सा. रणशिंग 13/2/2020 पान. क्र. 16

साप्ताहिक रणशिंग दि. १३/२

# तु. च. महाविद्यालयात जागतिक वेटलँड दिन साजरा

बारामती: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने महाविद्यालयात जागतिक वेटलँड दिनाचे आयोजन करण्यात आले होते. जागतिक वेटलँड दिन सर्वत्र २ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अजित तेळवे यांचे कोस्टल वेटलँड एन्ड बायोडायव्हर्सिटी या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते.

या विशेष व्याख्यानामध्ये त्यांनी आपल्या आजूबाजूच्या वेटलँड अर्थात पाणस्थळ जागा आणि त्यांचे महत्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलतांना ते म्हणाले की, ईराण येथील रामसार मध्ये २ फेब्रुवारी १९७१ साली झालेल्या करारानुसार पाणस्थळ जागेवरील जैवविविधतता संवर्धनासाठी सहभागी देशांनी ठराव मंजूर झाला होता. यामुळेच २ फेब्रुवारी हा दिवस जागतिक वेटलँड दिन म्हणून जगभर साजरा करण्यात येतो. पाणस्थळ जमिनी या प्रामुख्याने दोन प्रकारच्या असून त्या गोडे पाणी व खारे पाणी अशा विभागल्या जातात. प्रत्येक पाणस्थळ जागेत अनेक प्रकारचे जीव रहिवास करत असतात. कोस्टल वेटलँड अर्थात समुद्र किनाऱ्यांवरील पाणस्थळ जागा या निसर्गातील अत्यंत महत्वाचा घटक आहेत. किनारी प्रदेशात खारफुटी वनस्पती अर्थात मॅंग्रुव्हज महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असतात. त्सुनामी वेळी या वनस्पतींचा अत्यंत महत्वपूर्ण उपयोग होतो. शिवाय या वनस्पतींच्या मुळाशी विविध मासे प्रजननासाठी अंडी घालतात. या कोस्टल वेटलँडमध्ये जगभरात ६७ तर महाराष्ट्रात २७ वनस्पतींच्या प्रजाती आढळतात. महाराष्ट्राच्या कोस्टल वेटलँड मध्ये संशोधनादरम्यान डॉ. तेळवे यांना ६० ते ७० प्रकारचे पक्षी तसेच ३०-४० प्रकारचे कीटक-भक्ष्य आढळले. १९३० साली सापडलेल्या झायलोकोर्पस या मॅंग्रुव्हज प्रजाती बद्दल माहिती मिळाली होती. त्यानंतर २००१ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास गटामध्ये डॉ. तेळवे यांनी ही प्रजात पुन्हा नव्याने शोधली.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पर्यावरणाचे माणसाच्या आयुष्यातील महत्वाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलतांना ते म्हणाले की, आज जी नैसर्गिक हानी आपण अनुभवतो आहोत त्याला केवळ माणूस जबाबदार आहे. माणूस म्हणून आपण निसर्गाला बाजूला करत स्वकेंद्री सभोवताल बनवतो. यामुळे पर्यावरणाला आणि जैवविविधततेला आपण धोक्यात घातले आहे. पर्यावरण आणि जैवविविधतता संवर्धन ही प्रत्येक व्यक्तीची नैतिक जबाबदारी असून हेच आपण आपल्या पुढच्या पिढीला देणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी मांडले.

तत्पूर्वी या कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सीमा गोसावी-नाईक यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. यावेळी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार व प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. एस. जे. चव्हाण यांनी डॉ. तेळवे यांच्या संशोधनाबद्दल विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या अखेरीस डॉ. विलास कर्डिले यांनी आभार प्रदर्शन केले तर सूत्रसंचालन अमृता चव्हाण यांनी केले. यावेळी छायाचित्रांचे प्रदर्शन करण्यात आले. शिवाय पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध पोस्टरचे प्रदर्शन देखील केले. यासाठी पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुरश्री सोनवणे, वनस्पती शास्त्र विभागातील प्रा. हर्शल वांगीकर, प्रा. सौरभ चंदनकर, प्रा. गणेश पवार, प्रा. सुजित वाघ यांनी विशेष सहकार्य केले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दैनिक पुण्यनगरी दिनांक १५/०२/२०२० पान.नं.३

# टी. सी. महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा

**॥ बारामती : प्रतिनिधी**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात दिनांक ७ व ८ फेब्रुवारी रोजी संगणकशास्त्र विभागातर्फे दोनदिवसीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमधील तंत्रज्ञानात्मक गुणांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, चॅटर बॉक्स, फझी क्विझी, हॅकेथॉन या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विविध महाविद्यालयांतील एकूण १७३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांच्या अध्यक्षतेखाली व थॉटपॅड इन्फोटेक प्रा. लि.चे डायरेक्टर शिरीष कादबाने यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. विविध स्पर्धा व्यक्तिमत्त्व विकासात कशाप्रकारे महत्त्वाची भूमिका बजावतात, यासंदर्भात शिरीष कादबाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी अशा स्पर्धांमधून तंत्रज्ञानात्मक विकास व नवीन तंत्रज्ञानाची ओळख होते, असे सांगितले.

स्पर्धा यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा (सराफ), सचिव जवाहर शहा, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा समन्वयक प्रा. प्राजक्ता कुलकर्णी, विभागप्रमुख प्रा. उपेंद्र चौधरी, स्पर्धा समितीप्रमुख प्रा. सलमा शेख, प्रा. अस्मिता भगत, प्रा. शशिकांत नकाते, प्रा. दीपक कापसे, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

१५/२/२०
पुण्य नगरी 3

सार्वजनिक आक्रोश दि. १३/०२/२०२० पान नं. ३ व ४

फलटण गुरुवार, दि. १३.०२.२०२०

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

# एन.सी.सी. अधिकारी प्रा. बळे यांना महानिर्देशक बॅटन व सुवर्णपदक



**बारामती :** कामटी, नागपूर येथील एन. सी. सी. अधिकारी प्रशिक्षण अकादमी येथे राष्ट्रीय प्रशिक्षण २०२० संपन्न झाले. या प्रशिक्षणात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणारे महाविद्यालयाचे एन.सी.सी. अधिकारी लेफ्टनंट प्रा. विवेक बळे यांनी वरिष्ठ विभागातून गुणवत्तेच्या क्रमवारीत प्रथम क्रमांकासाठीची 'महानिर्देशक बटन' व 'सुवर्णपदक' मिळवले.

लेफ्टनंट विवेक बळे यांची दोन महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. पुणे मधून प्री-कमिशन प्रशिक्षणासाठी निवड झाली होती. या प्रशिक्षणासाठी भारतातून निवडक ४५७ प्राध्यापक व शिक्षक विविध महाविद्यालये आणि शाळांमधून सहभागी झाले होते. हे प्रशिक्षण दिनांक ४ नोव्हेंबर २०१९ ते १ फेब्रुवारी २०२० या कालावधीत संपन्न झाले. ३ महिन्याच्या कठोर प्रशिक्षण कार्यक्रमात शारीरिक शिक्षण, योग, परेड, नेतृत्व व व्यक्तिमत्व विकास, स्वच्छ भारत अभियान, डिजिटल इंडिया, आपत्ती व्यवस्थापन, सामाजिक जागरुकता आणि इतर

(पान क्र. ४ वर...

# एन.सी.सी. अधिकारी प्रा. बळे यांना महानिर्देशक बॅटन व सुवर्णपदक

(पान क्र. ३ वरुन...


अनेक लष्करी विषयांचा समावेश करण्यात आलेला होता.

शारीरिक शिक्षण, शस्त्रास्त्र प्रशिक्षण, शिकवण्याची क्षमता, नकाशा वाचन, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबीर स्थापना, कमांडिंग ऑफिसर लाईक क्वालिटी इत्यादी प्रकारात लेफ्टनंट बळे यांनी सर्वाधिक गुण प्राप्त करून पहिल्या दहा प्रशिक्षणार्थींमध्ये स्थान पक्के केले. पुढे शस्त्रास्त्र प्रशिक्षण, परेड, अध्यापन सराव परीक्षा व नंतर अधिकारी प्रशिक्षण अकादमी, कामटीचे कमांडंट मेजर जनरल आय.जे.एस. हुंडल यांच्या कन्फर्मेटरि मधून पहिल्या तीन मध्ये आपले स्थान निश्चित केले. अखेरीस लेफ्टनंट बळे यांनी महानिर्देशक बॅटन व सुवर्णपदकासह प्रथम क्रमांक मिळवला.

मागील सहा वर्षात महाराष्ट्रातील कोणत्याही एन. सी. सी. अधिकाऱ्यास हा बहुमान मिळवता आला नव्हता. प्रशिक्षणा दरम्यान सुरुवातीला त्यांनी कंपनी क्वार्टर मास्टर या पदावर कार्य केले. यानंतर कंपनी सिनियर अंडर ऑफिसर, ड्रील स्पर्धेत शिवाजी कंपनीचे नेतृत्व, पासिंग आउट परेड मध्ये परेड कमांडर अश्या विविध पदांवर कार्य केले. त्यांच्या या यशामुळे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती, महाराष्ट्र निर्देशालय एन. सी. सी. पुणे ग्रुप व दोन महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. पुणे यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, संस्थेचे अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार व दोन महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर एन. पी. एस. मौर्या यांनी लेफ्टनंट विवेक बळे यांचे अभिनंदन केले.

साप्ताहिक रणझिंग दि.20/02/2020 पान नं.७

# तु.च. महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा संपन्न



बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात दिनांक ७ व ८ फेब्रुवारी रोजी संगणक शास्त्र विभागातर्फे दोन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमधील तंत्रज्ञानात्मक गुणांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे तसेच त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा ह्या उद्देशाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, चॅटर बॉक्स, फझी क्विझी, हॅकेथोन या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विविध महाविद्यालयातील एकूण १७३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच श्री शिरीष कादबाने डायरेक्टर थॉटपॅड इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. विविध स्पर्धा व्यक्तिमत्व विकासात कशाप्रकारे महत्त्वाची भूमिका बजावतात यासंदर्भात श्री शिरीष कादबाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी अशा स्पर्धांमधून तंत्रज्ञानात्मक विकास तसेच नवीन तंत्रज्ञानाची ओळख यांचा व्यक्तिमत्व विकासात होणाऱ्या फायद्याबद्दल सांगितले.

ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष, श्री.अरहतदास शहा (सराफ), सचिव, जवाहर शहा (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार यांचे मार्गदर्शन लाभले तसेच स्पर्धा समन्वयक प्रा.प्राजक्ता कुलकर्णी, विभाग प्रमुख प्रा.उपेंद्र चौधरी, विविध स्पर्धा प्रमुख प्रा.सलम शेख, प्रा.अस्मिता भगत, प्रा. शशिकांत नकाते, प्रा.दीपक कापसे, विभागातील इतर प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

Tuljaram Chaturchand College * Library * Baramati *

मा० प्राचार्य साहेब

मंगळवार, १८ फेब्रुवारी २०२० MY पुणे जिल्हा पुढारी ३



'अनेकान्त टेक्नो कॉम्प २०२०' आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी शिरीष कादबाने यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व अन्य.

# 'अनेकान्त टेक्नो कॉम्प २०२०' स्पर्धा उत्साहात

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात नुकतेच संगणक शास्त्र विभागातर्फे दोनदिवसीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांमधील तंत्रज्ञानात्मक गुणांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, चॅटर बॉक्स, फझी क्विझी, हॅकेथोन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विविध महाविद्यालयातील एकूण १७३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच थॉटपॅड इन्फोटेक प्रा.लि.चे संचालक शिरीष कादबाने यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. विविध स्पर्धा व्यक्तिमत्व विकासात कशा प्रकारे महत्त्वाची भूमिका बजावतात या संदर्भात कादबाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी अशा स्पर्धांमधून तंत्रज्ञानात्मक विकास तसेच नवीन तंत्रज्ञानाची ओळख यांचा व्यक्तिमत्त्व विकासात होणाऱ्या फायद्याबद्दल सांगितले.

ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष, अरहतदास शहा (सराफ), सचिव, जवाहर शहा (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा समन्वयक प्रा. प्राजक्ता कुलकर्णी, विभाग प्रमुख प्रा. उपेंद्र चौधरी, विविध स्पर्धा प्रमुख प्रा. सलमा शेख, प्रा. अस्मिता भगत, प्रा. शशिकांत नकाते, प्रा. दीपक कापसे, विभागातील इतर प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

20/02/20

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दैनिक पुढारी दि. १७/०२/2020 पान नं. 2

# 'व्यासपीठ, श्रोत्यांमधील दुवा म्हणजे सूत्रसंचालक'



सूत्रसंचालन कार्यशाळेप्रसंगी डॉ. मिरजकर यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर.

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

'व्यासपीठ आणि श्रोते यांच्यामधील दुवा म्हणजे सूत्रसंचालक, असे मत प्रसिद्ध सूत्रसंचालक डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी व्यक्त केले.

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'सूत्रसंचालन' विषयावर कार्यशाळा झाली, त्या वेळी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर अध्यक्षस्थानी होते. डॉ. मिरजकर यांनी, विद्यार्थ्यांनी, सूत्रसंचालनाची कला कशाप्रकारे अवगत करावी, याविषयी अनेक लहानसहान बार्बीचे सप्रात्यक्षिक मार्गदर्शन केले. आवाजातील चढ-उतार, वेळेचे भान ठेवून तारतम्याने केलेले निवेदन, प्रभावी आवाज, सूत्रसंचालकाची देहबोली, त्याला करावे लागणारे योग्य ते संकलन याविषयी तपशीलवार माहिती दिली. त्याचप्रमाणे उपस्थित विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करवून घेतले. अध्यक्षीय भाषणात डॉ. मुरूमकर यांनी सांगितले, आजच्या युगात सूत्रसंचालनाची कला साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न करायला हवेत. अर्थार्जन आणि प्रसिद्धी दोन्ही अंगांनी या कलेला महत्त्व आहे.

मान्यवरांचे स्वागत मराठी विभागप्रमुख डॉ. रंजना नेमाडे; प्रास्ताविक डॉ. संदीप तापकीर आणि सूत्रसंचालन प्रा. राजकुमार तरडे यांनी केले. डॉ. सुनील खामगळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यशाळेत १०५ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.


Scanned with CamScanner

मा. प्राचार्यसाहेब

साप्ताहिक कऱ्हावार्ता दि. १७/०२/२०२० पान नं. ४

साप्ताहिक कऱ्हा वार्ता Weekly Karhawarta

# अनुवाद ही काळाजी गरज-डॉ.अनुपमा प्रभुणे



बारामती:- अनुवाद म्हणजे मूळ लेखकाचे भावविश्व दुसऱ्या भाषेतील वाचकांपर्यंत पोहोचविणे. त्यामुळे चांगला अनुवाद काळाजी गरज असल्याचे मत शारदानगरच्या हिंदी विभागाचे प्रमुख डॉ.अनुपमा प्रभुणे यांनी व्यक्त केले. येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात हिंदी विभागांतर्गत सुरु करण्यात आलेल्या अनुवाद पदविका अभ्यासक्रमांतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, अनुवाद म्हणजे मूळ लेखकाचा भावविश्व दुसऱ्या भाषेत वाचकांपर्यंत पोहचवणे. सुयोग्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून चांगले अनुवादक निर्माण करणे काळाची गरज आहे. अनुवाद ही एक कला आहे. दिवसेंदिवस अनुवादाचे महत्त्व वाढत आहे. आपले स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करण्याची ही एक संधी आहे. या वेळी अनुवादासंदर्भात वेगवेगळी उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमांचे ज्ञान आत्मसात केले पाहिजे आणि त्याचा उपयोग अनुवादासाठी केला पाहिजे. अनुवादाचे विश्व विद्यार्थ्यांनी जाणून घेतले पाहिजे. नवा दृष्टीकोन ठेऊन अभ्यास केला पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रतिभा जावळे यांनी केले. तसेच हिंदी विभाग प्रमुख डॉ.प्रदीप सरवदे यांनी पाहुण्यांचे स्वागत आणि परिचय करून दिला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा सराफ, सचिव जवाहर शहा वाघोलीकर यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन राहीन शेख यांनी केले. डॉ.संदीप पवार यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ दिनांक १७/०२/२०२० पान नं. ५.

# 'तुळजाराम'मधील स्पर्धेत १७३ स्पर्धकांचा सहभाग

**बारामती, ता. १६ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात संगणक शास्त्र विभागातर्फे दोनदिवसीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात विविध महाविद्यालयातील एकूण १७३ स्पर्धकांनी यात सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांतील तंत्रज्ञानात्मक गुणांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन केले गेले. पोस्टर प्रेझेंटेशन, चॅटर बॉक्स, फझी क्विझी, हॅकेथोन या स्पर्धांचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व थॉटपॅड इन्फोटेकचे संचालक शिरीष कादबाने यांच्या हस्ते उद्घाटन झाले. शिरीष कादबाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चंद्रशेखर मुरूमकर यांनी अशा स्पर्धांमधून तंत्रज्ञानात्मक विकास व नवीन तंत्रज्ञानाची ओळख यांचा व्यक्तिमत्त्व विकासात होणाऱ्या फायद्याबद्दल सांगितले. संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ, सचिव जवाहर वाघोलीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, रजिस्ट्रार यांचे मार्गदर्शन लाभले.

CamScanner

1538

Tuljaram Chaturchand College Library Baramati

मा. प्राचार्य साहेब,

दै. पुढारी ता. 12/03/20 पान 2

# मुलींच्या, महिलांच्या सुरक्षिततेवर भर : उपमुख्यमंत्री अजित पवार

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

शाळा-महाविद्यालयीन मुली, महिलांच्या सुरक्षितेसंबंधी राज्य शासन आवश्यक ती कार्यवाही करत आहे. मुली, महिलांनीही काही अडचण असल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधत मदत घ्यावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

बारामती शहर पोलीस स्टेशन व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय परिसरामध्ये पोलीस चौकी उभारण्यात आली. या चौकीचे उदघाटन पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण शिरगावकर,



टी. सी. महाविद्यालयातील पोलिस चौकीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडले.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहर शहा-वाघोलीकर, खजिनदार सुनील शहा-लेंगरेकर, विश्वस्त मिलिंद शहा-वाघोलीकर, विकास शहा-लेंगरेकर, चंद्रवदन शहा-मुंबईकर, चंद्रगुप्त शहा-वाघोलीकर, राहूल शहा-वाघोलीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ.अजित तेलवे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, पोलिस निरीक्षक मानसिंह खोचे, पोलिस नाईक अमृता भोईटे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, महाविद्यालयात स्थापन झालेल्या या पोलीस चौकीमुळे नागरिकांची सोय झाली असून टी.सी. कॉलेज व आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या व विशेषतः मुलींच्या व महिलांच्या संरक्षणात वाढ होईल व त्यामुळे गैरकृत्यास आळा बसेल. महाविद्यालयातील या पोलिस चौकीसाठी पोलिस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी पाठपुरावा केला होता.

Chaturchand College Library Baramati

दै. सकाळ

पुणे, बुधवार,
११ मार्च २०२० ५

## टी. सी. कॉलेजजवळ पोलिस चौकी सुरू

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय परिसरातील पोलिस चौकीचा उपयोग विद्यार्थ्यांसह नागरिकांनाही होईल, असा विश्‍वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. बारामती शहर पोलिस व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या वतीने महाविद्यालय परिसरामध्ये पोलिस चौकी उभारली आहे. तिच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण शिरगावकर, अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहर वाघोलीकर व पोलिस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी चौकीसाठी पाठपुरावा केला होता. या प्रसंगी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, नारायण शिरगावकर, पोलिस निरीक्षक मानसिंग खोचे, पोलिस नाईक अमृता भोईटे यांच्यासह सुनील लेंगरेकर, मिलिंद वाघोलीकर, विकास लेंगरेकर, चंद्रवदन मुंबईकर, चंद्रगुप्त वाघोलीकर, राहुल वाघोलीकर, डॉ. अजित तेलवे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा आदी मान्यवर उपस्थित होते.

दै. लोकमत दि 12/3/20 पान 3



## विद्यार्थ्यांनी केला कष्टकरी महिलांचा सन्मान

बारामती : जागतिक महिला दिनानिमित्त तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कष्टकरी महिलांचा सन्मान केला. महाविद्यालयातून बाहेर पडल्यावर काजल समिंदर, रीतेश साळवे, सूरज वायसे, तुषार धायगुडे, रुपाली शिरसट आदी विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी बांधकामावर काम करणाऱ्या मजूर महिला, रस्त्यावर भाजीविक्रेत्या महिला, पेट्रोलपंपावर काम करणाऱ्या महिला कर्मचारी, पाणीपुरीचा गाडा चालविणाऱ्या व्यावसायिक महिला, वेगवेगळ्या मॉलमध्ये काम करणाऱ्या महिलांना गुलाबाचे फूल आणि कॅडबरी देऊन सन्मान करण्यात आला. काम, कष्ट हेच आयुष्य ही मानसिकता असलेल्या महिलांना विद्यार्थ्यांनी महिला दिनाची माहिती दिली व हक्कांची जाणिव करुन दिली.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

मा. प्राचार्य साहेब



# 'गाव तेथे ग्रंथालय' ही चळवळ होणे गरजेचे

## प्राचार्य गोसावी यांचे मत

बारामती : पुढारी वृत्तसेवा

सध्या समाजात वाचनाचे प्रमाण कमी झालेले आहे. वाचनाने भाषेचा विकास होतो. वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी 'गाव तेथे ग्रंथालय' ही चळवळ व्हावी, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेतील माजी प्राचार्य सीताराम गोसावी यांनी केले.

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरवदिनाच्या सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर होते.



तुळजाराम महाविद्यालयात आयोजित मराठी भाषा गौरव दिनी प्राचार्य सीताराम गोसावी यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर.

प्राचार्य गोसावी म्हणाले, शासन मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी प्रयत्नशील आहे. शासनाने पहिली ते दहावीपर्यंत सर्व शाळांमध्ये मराठी विषय अनिवार्य केल्याचे विधेयक संमत केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन. मराठी भाषेच्या विकासासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक सुजाण नागरिक, विविध संस्थांनी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. न्यायालयातही मराठी भाषेचा वापर करणे सक्तीचे करावे. बहुभाषिकता असणे ही आजची गरज आहे. साने गुरुजींची आंतरभारतीची कल्पना भाषेच्या संदर्भातही प्रत्यक्षात यावी, असे ते म्हणाले.

प्राचार्य डॉ. मुरूमकर म्हणाले, 'बालसाहित्याकडे आज आपले दुर्लक्ष झाले आहे. साहित्यात नवनवीन प्रयोग व्हावेत. मराठी भाषा विकासासाठी तंत्रज्ञानाचा वापर व्हावा. लघुपटनिर्मिती, नवनवीन शब्दनिर्मिती, बालगीत लेखन, बालनाटिका असे उपक्रम वाढावेत. मराठी भाषेबाबत समाज उदासीन आहे याबद्दलची खंत त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. रंजना नेमाडे यांनी केले. प्रा. राजकुमार तरडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मुक्ता आंभेरे यांनी आभार मानले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

सा. रणांगण दि.२५/०३/२०१५ पान २

# मुलींच्या व महिलांच्या सुरक्षिततेवर भर-अजितदादा

बारामती- बारामती शहर पोलीस स्टेशन व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय परिसरामध्ये पोलीस चौकी उभारण्यात आली असून त्याचे उदघाटन महाराष्ट्र राज्याचे मा.नामदार उपमुख्यमंत्री अजितदादा पवारसो यांचे शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, 'महाविद्यालयात स्थापन झालेल्या या पोलीस चौकी मुळे नागरिकांची सोय झाली असून टी.सी. कॉलेज व आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या व विशेषतः मुलींच्या व महिलांच्या संरक्षणात वाढ होईल व त्यामुळे गैरकृत्यास आळा बसेल'. या प्रसंगी मा. नामदार उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांचे स्वागत व सत्कार बारामतीचे उपविभागीय पोलीस अधिकारी, मा.श्री.नारायण शिरगावकर, तसेच अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री.जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर) यांनी केले ही पोलीस चौकी उभारण्यामध्ये शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, श्री.औदूंबर पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला व विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे याप्रसंगी पोलीस निरीक्षक श्री. मानसिंह खोचे, श्रीमती अमृता भोईटे मॅडम पोलीस नाईक इ. मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार श्री.सुनील शहा (लेंगरेकर) विश्वस्त श्री.मिलिंद शहा (वाघोलीकर), श्री.विकास शहा (लेंगरेकर), श्री.चंद्रवदन शहा (मुंबईकर), चंद्रगुप्त शहा (वाघोलीकर), श्री.राहूल शहा (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ.अजित तेलवे, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा हे उपस्थित होते.

...urchand College ★ ... Library

दै. पुढारी दि. ०२/०३/२० पान ५



तुळजाराम महाविद्यालयात संस्कृत मुलाखत कार्यक्रमप्रसंगी बोलताना तेजस कुलकर्णी. व्यासपीठावर अन्य मान्यवर.

## 'टीसी' महाविद्यालयात संस्कृत मुलाखत

**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात या शैक्षणिक वर्षात सुरू झालेल्या संस्कृत विभागामार्फत तेजस कुलकर्णी यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते. या कार्यक्रमासाठी तेजस कुलकर्णी हे पुणे येथील संस्कृत अभ्यासक तसेच आधुनिक आणि पारंपरिक अर्थात गुरुकुल अशा दोन्ही पद्धतीने शिक्षण प्राप्त केलेले आहेत. त्यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून गुरुकुल म्हणजे काय आहे, गुरुकुल शिक्षण परंपरेतील वातावरण, आजदेखील असे गुरुकुल अस्तित्वात आहेत का, गुरुकुलातील परीक्षा पद्धती कशा असतात, प्राचीन भारतीय गणितशास्त्र म्हणजे काय आणि त्याचे आजच्या जगातील उपयोजन कसे करता येऊ शकते, अशा विविध प्रश्नांच्या माध्यमातून मुलाखत पार पडली. या कार्यक्रमासाठी शिवळे महाविद्यालयाचे तत्त्वज्ञान विभागप्रमुख डॉ. सुनीलदत्त गवरे तसेच मुधोजी महाविद्यालय, फलटणचे तत्त्वज्ञान विभागप्रमुख डॉ. नवनाथ रासकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे तत्त्वज्ञान विभागप्रमुख प्रा. कृष्णात नगरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अनिरुद्ध किल्लेदार यांनी केले. स्वप्नाली मदने या विद्यार्थिनीने आभार मानले. पुढारी २/३/२०, ५

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

दै. सकाळ दि. २/३/२० पान ८

# बारामतीमध्ये मराठीदिनी नाटक, नृत्य, काव्यगायन

**बारामती, ता. १ :** येथील अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये मराठी भाषा दिवस साजरा केला गेला. या वेळी मालिका अभिनेते गजानन गडकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. जीवनात यशस्वी होण्यासाठी काय केले पाहिजे, याचा कानमंत्र त्यांनी मुलांना दिला.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी नाटक, नृत्य, काव्यवाचन, अभंग गायन सादर करून मराठी भाषेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. सुंदर हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्यांना गजानन गडकर यांच्या हस्ते पारितोषिके दिली गेली. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या राखी माथूर, समन्वयिका स्मिता ढवळीकर, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक विशाल बारवकर यांनी केले. सूत्रसंचालन दीपक गाढवे यांनी केले. प्राचार्या राखी माथूर यांनी आभार मानले. स २/३/२० पा ८

मा. प्राचार्य साहेब

दै. सकाळ दि 17/03/20 पान 01

# 'टीसी' कॉलेजमधील गुणवंत खेळाडूंचा गौरव

**बारामती, ता. १६ :** खेळ खेळताना करिअर करण्याच्या दृष्टीने खेळाडूंनी वाटचाल करावी, असे आवाहन विद्यापीठ क्रीडा मंडळाचे संचालक डॉ. दीपक माने यांनी केले.

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील गुणवंत खेळाडूंचा गुणगौरव समारंभ नुकताच पार पडला. त्या प्रसंगी डॉ. माने बोलत होते.

या समारंभात वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील आंतरविद्यापीठ, राष्ट्रीय, राज्यस्तर व विभागस्तरावर खेळलेल्या २१५ खेळाडूंचा महाविद्यालयातर्फे ट्रॅकसूट, प्रमाणपत्र, पदक व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण शिरगावकर या प्रसंगी उपस्थित होते. शिरगावकर यांनीही राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळाल्यास पाच टक्के खेळाडू आरक्षणाचा फायदा घेता येतो याची माहिती दिली.

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सदस्य मिलिंद वाघोलीकर यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरहतदा सराफ, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ.अविनाश जगताप, डॉ.अजित तेलवे, डॉ. सचिन गाडेकर, वैशाली माळी, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, समन्वयक राजेंद्र आगवणे व गोरखनाथ मोरे उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी केले. पारितोषिक वाचन अशोक देवकर यांनी अहवाल वाचन डॉ.गौतम जाधव यांनी आभार राजेंद्र आगवणे यांनी मानले. सूत्रसंचालन संजय शेंडे यांनी केले.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati

MS 18.3.

लटण सा. आक्रोश १५/३/२० पान ४ ४

# 'अनेकान्त आविष्कार' टी.सी. महाविद्यालयात उत्साहात संपन्न

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयात 'अनेकान्त आविष्कार' पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांचे हस्ते याचे उदघाटन झाले. 'माय इनोव्हेटीव्ह रोल फॉर इंडिया' ही संकल्पना विद्यार्थ्यांना देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी यावर आधारित विविध स्पर्धा व प्रदर्शनात सहभाग घेतला.

'अनेकान्त आविष्कार' या उपक्रमातील विद्यार्थ्यांचा दरवर्षी सहभाग वाढत असल्याने या उपक्रमाची लोकप्रियतादेखील वाढत आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ आणि कृतिशील बनून देशासाठी योगदान द्यावे असे आवाहन प्राचार्य डॉ.मुरूमकर यांनी केले. कला, विज्ञान, वाणिज्य व व्यवसाय शिक्षण शाखेतील विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण अशी ७० वर्किंग मॉडेल्स या प्रदर्शनात मांडली होती. प्रदर्शनाची पाहणी करताना प्राचार्य डॉ.मुरूमकर यांनी विद्यार्थ्यांच्या या विविध उपक्रमांचे कौतुक करून भविष्यासाठी प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या.

उत्स्फूर्त वक्तृत्व, निबंध, काव्यवाचन, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर, रांगोळी, घोषवाक्य, पाककला, पुष्परचना, शॉर्ट फिल्म मेकिंग, इत्यादी स्पर्धांचे आयोजन यावेळी करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांच्या अप्रतिम अशा सांस्कृतिक कलाविष्काराने या उपक्रमाची उंची अधिक वाढविली. यावेळी उपप्राचार्या सौ.वैशाली माळी यांनी विद्यार्थ्यांच्या या विविधतेतून सादर केलेल्या कलाविष्काराचे कौतुक करून नवोदित कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

पु. ५६/८१ दि. ११/०६/२० पान ७०

माहिती दिली आहे. त्यांनीच ... हा पुरस्कार मिळविला दिला ... उपयोगी ठरू शकत.

# तु. च. महाविद्यालयात कनिष्ठ विभागाचे ऑनलाईन अध्यापन सुरु

बारामती-तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील कला, शास्त्र, वाणिज्य व व्यवसाय शिक्षण शाखांचे ऑनलाईन अध्यापन दि. १ जून २०२० पासून सुरु झाले आहे. बारावी प्रवेश प्रक्रिया दि. १८ मे पासून ऑनलाईन सुरु झाली असून ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ॲडमिशन पूर्ण केलेली आहेत.

इ. १२ वी म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्वाचा टप्पा आहे. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता विद्यार्थी ज्ञान, आकलन, अभिव्यक्ती यापासून वंचित राहू नये याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञानाचे स्रोत पोहोचविण्याचे काम करावेच लागेल असा विचार मा.प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी सर्व शिक्षकांमध्ये रुजविला. हा उपक्रम प्रत्यक्षात उतरवण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील इ. १२ वीचे सर्व शाखांचे सर्व विषयांचे ऑनलाईन टिचिंग करण्यांसाठी चार दिवसाच्या कृतिसत्रातून सर्व शिक्षकांना ऑनलाईन ट्रेनिंग देण्यात आले. याचाच परिपाक म्हणून शिक्षकांनी आपल्या विषयांची पूर्ण तयारी करून गुगल क्लासरूमच्या माध्यमाद्वारे दि. १ जून २०२० पासून ऑनलाईन क्लास सुरु केले आहेत. विविध जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण घेत आहेत.

Chaturchand College Library


मा. प्राचार्य साहेब

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय परिसरातील पोलीस चौकीचे उदघाटन

# मुलींच्या व महिलांच्या सुरक्षिततेवर भर : उपमुख्यमंत्री अजित पवार

**बारामती** : शहर पोलीस स्टेशन व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय परिसरामध्ये पोलीस चौकी उभारण्यात आली असून त्याचे उदघाटन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे शुभहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, महाविद्यालयात स्थापन झालेल्या या पोलीस चौकी मुळे नागरिकांची सोय झाली असून टी.सी. कॉलेज व आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या व विशेषतः मुलींच्या व महिलांच्या संरक्षणात वाढ होईल व त्यामुळे गैरकृत्यास आळा बसेल'.



या प्रसंगी उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे स्वागत व सत्कार उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री. नारायण शिरगावकर, तसेच अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री. जवाहर शाह (वाघोलीकर) यांनी केले.


ही पोलीस चौकी उभारण्यामध्ये शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, श्री.औदूंबर पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला व विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे याप्रसंगी पोलीस निरीक्षक श्री.मानसिंह खोचे, श्रीमती अमृता भोईटे मॅडम पोलीस नाईक इ. मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार श्री.सुनील शहा (लेंगरेकर) विश्वस्त श्री.मिलिंद शहा (वाघोलीकर), श्री.विकास शहा (लेंगरेकर), चंद्रगुप्त शहा (वाघोलीकर), श्री.राहूल शहा (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे, रजिस्ट्रार श्री.अभिनंदन शहा हे उपस्थित होते.

पान ७
दै. आक्रोश १५३१२०

Tuljaram Chaturchand College Library

# अनेकान्त स्कुलला सीबीएसई संलग्नता प्राप्त



बारामती-बारामतीमधील ख्यातनाम अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इंग्लीश मिडीयम स्कुलला नुकतीच केंद्रीय माध्यमिक बोर्डाची सबीएसई मान्यता प्राप्त झाली आहे. स्कुलमध्ये मुलांच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांना वाव देऊन त्यांच्यात सर्जनशीलता व, उपक्रमशीलता निर्माण व्हावी या दृष्टीने नाविन्यपूर्ण शिक्षणावर भर दिला जात आहे.

नव्या पिढीच्या गरजा ओळखून २०१२ पासून अनेकान्त इंग्लीश मिडीयम स्कुलची मुहूर्तमेढ रोवली आणि खऱ्या अर्थाने पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक दर्जेदार शिक्षणाचे दार नव्या पिढीपुढे उपलब्ध करून दिले. सध्या स्कुलमध्ये १२०० हुन अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अत्यंत तज्ञ व प्रशिक्षित शिक्षक आणि अद्ययावत साधनसोई असणारी ही दर्जेदार शैक्षणिक संस्था नावलौकिकपात्र ठरली आहे. अनेकांत स्कुलच्या भव्य इमारतीमध्ये अत्यंत आधुनिक पद्धतीच्या क्लासरूम्स, स्वतंत्र संगणक कक्ष, अद्ययावत ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, खेळाचे भव्य मैदान, देखणे अँपीथिएटर मुलांच्या गरजेनुसार सुश्रुषा खोल्या, विश्रांती कक्ष इत्यादी सुविधांनी युक्त दर्जेदार शिक्षण अनेकांत स्कुल देत आहे. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी स्कुलमध्ये विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम राबविले जातात.


सध्या सर्वत्र कोरोनाचे सावट आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून लॉकडाऊनच्या कालावधीतही सर्व शाळा बंद असताना देखील स्कुलने विद्यार्थ्यांसाठी टेनो ॲप द्वारे ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली असून विद्यार्थी घरबसल्या शिक्षण घेत आहेत. विविध वर्गांची प्रवेश प्रक्रिया देखील ऑनलाईन सुरु आहे. अशी माहिती अनेकांत इंग्लीश मिडीयम स्कुलचे अध्यक्ष श्री. मिलिंद शहा (वाघोलीकर) यांनी दिली. या सीबीएससी मान्यतेचा समस्त बारामती व आसपासच्या परिसरातील विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल अशी ग्वाही अनेकांत स्कुलच्या प्राचार्या सौ. राखी माथूर यांनी दिली. सीबीएसई मान्यता घेणेकामी संस्थेचे सचिव श्री. जवाहर शहा (वाघोलीकर) यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल अनेकांत स्कुलचे सर्व विश्वस्त यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

Chaturchand College Library Baramati

सा. रणशिंग दि. 25/06/2020 पान 6

मा. प्राचार्य साहेब

# व्हर्च्युअल कोर्सेससाठी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीसोबत पढेगा भारतचा करार



बारामती-कोरोनाच्या महासंकट काळात व्हर्च्युअल ऑनलाईन शिक्षण पध्दतीने आधुनिक कोर्सेस विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वायत्त दर्जा प्राप्त अनेकान्त एज्युकेशन सोसायटीने पढेगा भारतशी नुकताच करार केला आहे.

हेल्दीग्लोब स्मार्ट व्हर्च्युअल क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान संगत विविध कोर्सेस तसेच कौशल्य विकासाचे अनेक कोर्सेस व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मद्वारे ऑनलाईन उपलब्ध केले आहेत. सदर ऑनलाईन प्लॅटफॉर्मची सुविधा टी.सी.कॉलेज तसेच परिसरातील अन्य हायस्कुल व महाविद्यालयांना उपलब्ध व्हावी यासाठी हा करार करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी सांगितले. याप्रसंगी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त श्री.मिलिंद शहा वाघोलीकर यांनी सांगितले. याप्रसंगी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त श्री.मिलिंद शहा वाघोलीकर, 'पढेगा भारत'चे संस्थापक व माजी खासदार श्री.अमर साबळे, व्यवस्थापकीय संचालिका वेणू साबळे आदी मान्यवर उपस्थित होते. आर्टिफिशअल इंटेलिजन्स, बिझनेस इंटेलिजन्स, ब्लॉकचेन, इंटरनेट ऑफ थिंग (आयओटी) मशीन लर्निंग, पायथॉन, सॅप मोड्यूल्स, फॉरेन लँग्वेजेस, ऐग्रो बिझनेस मॅनेजमेंट आदी आधुनिक तंत्रज्ञानसंगत कोर्सेस याशिवाय रोजगाराभिमुख फार्मा इंडस्ट्री कोर्सेस, हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट कोर्स तसेच ज्ञानरचना वादावर व नवनिर्मिती मूल्यांवर आधारित इ. ८ वी ते १२ वी पर्यंतच्या अभ्यासक्रमाची निर्मिती' पढेगा भारत'ने केली आहे.

आधुनिक तंत्रज्ञान सुसंगत, तंत्रकौशल्यावर आधारित ज्ञानरचनावाद व नवनिर्मिती मूल्यांवर आधारित उच्च दर्जाचे शिक्षण व्हर्चुअल ऑनलाईन तंत्रज्ञानाने सर्वदूर आणि माफक दरात पोहोचविण्याचा आमचा हा संकल्प असल्याचे प्रतिपादन श्री. जवाहर शहा यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, संस्थेच्या माध्यमातून महाविद्यालया-बरोबरच अनेकान्त इंग्लीश मिडीयम स्कुल तसेच आसपासच्या परिसरातील, अन्य शाळांतील विद्यार्थ्यांना देखील या उपक्रमाचा फायदा होईल असा आम्हांस विश्वास आहे.

...ram Chaturchand College Library

ABC 25/6

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरु

बारामती-अनेकान्त एज्युकेशन सोसायटीची तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय अनेकान्त एज्युकेशन सोसायटीची स्थापना जैन धर्मियांचे परमपूज्य गुरुदेव १०८ श्री समन्तभद्र महाराज यांच्या आशिर्वादाने आणि हैद्राबाद राज्याचे तत्कालिन शिक्षणमंत्री स्व.फुलचंदजी गांधी यांच्या पुढाकाराने २७ एप्रिल १९६२ साली झाली. संस्थेतर्फे ग्रामीण भागातील विद्यार्थीविद्यार्थिनींच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची स्थापना २३ जून रोजी १९६२ करण्यात आली. सध्या महाविद्यालयात जवळपास १२,०००, विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय हे महाराष्ट्रातील एक अग्रगण्य, उच्च क्षमताशील व सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून ओळखले जात आहे. सिद्धिरनेकान्तात हे ब्रीदवाक्य असलेल्या अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास युजीसी कडून स्वायत्त दर्जा प्रदान केला आहे. महाविद्यालयास नुकतेच राष्ट्रीय स्तरावरील स्वायत्त महाविद्यालय ५८ वे रँकिंग प्राप्त झाले. महाविद्यालयास युजीसी रुसा कडून स्वायत्ततेअंतर्गत अनुदान मंजूर झाले आहे. युजीसीकडून 'परामर्श' स्कीम, सीपीई दर्जा, डीबीटी तर्फे 'स्टार कॉलेज स्कीम' चा दर्जा तसेच डीएसटी फिस्ट, यासारख्या योजनांमधून भरघोस अनुदान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'आयएसओ ९००१-२०१५', ग्रीन ऑडीट मानांकन महाविद्यालयाने मिळविलेले आहे.

सध्या संस्थेच्या अध्यक्षपदी मा.श्री.अरहतदास हिराचंद शहा (सराफ), सचिवपदी मा.श्री.जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर) व खजिनदारपदी मा.श्री.सुनिल शिवलाल शहा (लेंगरेकर) कार्यरत आहेत. तसेच मा.श्री.मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर) व मा.श्री.विकास शशिकांत शहा (लेंगरेकर), मा.श्री.राजकुमार शहा (वाघोलीकर) मा.श्री.चंद्रगुप्त शाह (वाघोलीकर), मा.श्री.चंद्रवदन शहा (मुंबईकर) व अन्य सदस्य कार्यरत आहेत.

तसेच नॅक, बेंगलोर यांचेकडून ए+ सिजीपीए, ३.५५ दर्जा प्रदान केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार व डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरुमकर यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देवून उल्लेखनीय मानांकनाची भर घातली आहे. तसेच पर्ल फौंडेशन, मदुराई यांनी महाविद्यालय, प्राचार्य, प्राध्यापक, रजिस्ट्रार यांना असे विविध ११ पुरस्कार प्रदान केले. यावर्षी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून 'उत्कृष्ठ युनिट पुरस्कार' व उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार प्राप्त झाला.

महाविद्यालयात पदवीस्तरावर २५, पदव्युत्तर स्तरावर १९ विषयांचे अध्यापन केले जाते. बी.व्होकेशनल या व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत फुड प्रोसेसिंग ॲण्ड पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी, जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन, रिटेल मॅनेजमेंट, ई-कॉमर्स आणि सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड नेटवर्किंग, तसेच




एम.व्होक. फूड प्रोसेसिंग व मास मिडिया हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. कोरोनाच्या महासंकट काळात व्हर्च्युअल ऑनलाईन शिक्षण पध्दतीने आधुनिक कोर्सेस विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीने पढेगा भारत शी नुकताच करार केला आहे. हेल्दीग्लोब स्मार्ट व्हर्च्युअल क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान संगत विविध कोर्सेस तसेच कौशल्य विकासाचे अनेक कोर्सेस व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मद्वारे ऑनलाईन उपलब्ध केले आहेत. स्कील्ड युथ तयार करण्याच्या दृष्टीने विविध स्कील्स आत्मसात होऊन विद्यार्थी सक्षम व्हावा म्हणून महाविद्यालयाने विविध सर्टिफिकेट कोर्सेस सुरु केले आहेत.

तसेच विद्यार्थ्यांमधील कलागुण विकसित होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात दैनंदिन अध्यापना-बरोबरच कत्थक, फोटोग्राफी, नाट्यप्रशिक्षण, जर्मन व फ्रेंच, मोडीलीपीं असे विविध कोर्सेस सुरु केले आहेत. राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी. कविवर्य मोरोपंत वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा, विद्यार्थी कल्याण मंडळ, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, वाचन प्रेरणा दिन, अस्मिता. भित्तीपत्रक, कोजागिरी काव्यमैफिल, हेल्थ चेक-अप, योगा डे, इ. अनेक विद्यार्थीभिमुख उपक्रम राबविले जातात. सेंद्रीय खत प्रकल्प, बायोगॅस मातीपरीक्षण पवनउर्जा इ. पर्यावरणसंवर्धन पूरक योजनाही महाविद्यालयात आवर्जून राबविल्या जातात. विद्यार्थी कल्याण मंडळांतर्गत विविध चर्चासत्रे, शिबीरे कार्यशाळांचे आयोजन केले जाते. विद्यार्थी, प्राध्यापक संशोधक यांचे करिता स्वतंत्र सी. आय. ए. आर. केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. महाविद्यालयाचे सुसज्ज व समृध्द ग्रंथालय, अद्ययावत प्रयोगशाळा, भव्य क्रीडांगण व जिमखाना विभाग, प्रशासन भवन इमारत, विद्यार्थी ग्राहक भांडार, महाविद्यालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था, बँक इ. सुविधा ही महाविद्यालयाची ठळकवैशिष्ठ्ये म्हणता येतील.

विविध विषयांवरील राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे आणि कार्यशाळांचे सातत्याने यशस्वीरित्या आयोजन करून महाविद्यालयाने आपली वेगळी ओळख जपली आहे. यामध्ये विशेषतः यावर्षी आंतर विभागीय मुलींच्या बेसबॉल स्पर्धा व मागील वर्षी कॉर्फबॉल स्पर्धा आयोजित केल्या.

महाविद्यालयास युजीसी रुसा कडून स्वायत्ततेअंतर्गत अनुदान मंजूर झाले आहे. युजीसीकडून 'परामर्श' स्कीम, सीपीई दर्जा, डीबीटी तर्फे 'स्टार कॉलेज स्कीम' चा दर्जा तसेच डीएसटी फिस्ट, यासारख्या योजनांमधून भरघोस अनुदान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'आयएसओ ९००१-२०१५', ग्रीन ऑडीट मानांकन महाविद्यालयाने मिळविलेले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देखील विविध वेबिनार महाविद्यालय आयोजित करीत आहे. निकाल व प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन सुरु आहे. व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे लेक्चर्स, व्हर्च्युअल क्लासरूमद्वारे चर्चासत्रे, व्हाट्सअप, मेल, फेसबुक इ. सोशल मीडियाच्या आधारे ऑनलाईन टिचिंग इ. महाविद्यालयाचे शैक्षणिक कार्य प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांचे मार्गदर्शनाखाली अव्याहतपणें सुरूच आहे. महाविद्यालयाची आज यशस्वीपणे घोडदौड सुरु आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी देशभरात विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत याचा संस्थेला व महाविद्यालयाला सार्थ अभिमान आहे.

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

मा. प्राचार्य साहेब,

बुधवार, ११ नोव्हेंबर २०२०

MY पुणे जिल्हा पुढारी ३



तेलंगणाचे कृषिमंत्री एस. निरंजन रेड्डी यांचा सत्कार करताना जवाहर शाह वाघोलीकर, मिलिंद शाह वाघोलीकर व अन्य.

# 'अनेकान्त'चे अविरत ज्ञानदानाचे कार्य कौतुकास्पद : एस. रेड्डी

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षण क्षेत्रात गेल्या ६० वर्षांपासून ज्ञानदानाचे अविरत काम करणाऱ्या संस्थेची प्रगती कौतुकास्पद आहे. बारामतीच्या विकासामध्ये संस्थेचाही महत्त्वाचा वाटा आहे, हे पाहून समाधान वाटले, असे गौरवोद्गार तेलंगणा राज्याचे कृषिमंत्री एस. निरंजन रेड्डी यांनी काढले.

एस. निरंजन रेड्डी यांनी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलला सदिच्छा भेट दिली. या वेळी महाविद्यालयातील विविध विभागांची त्यांनी पाहणी केली व उपक्रमांची माहिती घेतली. त्यांनी व्होकेशनल सेंटरमधील फूड प्रोसेसिंग, जर्नालिझम आणि रिटेल मॅनेजमेंट विभागांना भेट दिली. तेव्हा व्यावसायभिमुख अभ्यासक्रम ही काळाची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी संस्थेच्या व महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख मांडला. संस्थेचे सचिव जवाहर शाह वाघोलीकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कृषिमंत्री रेड्डी यांनी अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजलादेखील भेट दिली. या वेळी डॉ. एम. ए. लाहोरी यांनी माहिती दिली. अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलला भेट दिली.

बारामतीमध्ये अशा प्रकारची शैक्षणिक क्षेत्रात अग्रणी शाळा असल्याचे कौतुक त्यांनी केले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्कूलकडून ऑनलाइन एज्युकेशनसाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. स्कूलच्या प्राचार्या राखी माथूर यांनी अनेकान्त स्कूलबाबत माहिती दिली. संस्थेच्या या तीनही शैक्षणिक घटकांशी तेलंगणा राज्यात सहकार्य करायला निश्चितच आम्हाला आवडेल, अशी भावना त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

या वेळी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सदस्य मिलिंद शहा वाघोलीकर, धवल शाह वाघोलीकर, बारामतीचे माजी नगराध्यक्ष सदाशिव सातव, उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेलवे, इंद्रजित धुमाळ हे उपस्थित होते.

AB S
12/13.11.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

साप्ताहिक रणशिंग
दि. १२/११/२०२०

पान ५

# अनेकान्त एज्युकेशन सोसायटीस एस.निरंजन रेड्डी-कृषीमंत्री तेलंगणांची भेट



बारामती - शिक्षणक्षेत्रात गेल्या ६० वर्षांपासून ज्ञानदानाचे अविरत काम करणा-या संस्थेची प्रगती कौतुकास्पद आहे. बारामतीच्या विकासामध्ये संस्थेचा देखील महत्वाचा वाटा आहे हे पाहून समाधान वाटले असे गौरवोद्गार तेलंगणा राज्याचे कृषीमंत्री एस.निरंजन रेड्डी यांनी काढले. एस.निरंजन रेड्डी यांनी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व अनेकान्त इंग्लीश मिडीयम स्कूलला सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी महाविद्यालयातील विविध विभागांची त्यांनी पाहणी केली व उपक्रमांची माहिती घेतली. त्यांनी व्होकेशनल सेंटरमधील फुड प्रोसेसिंग, जर्नालिझम आणि रिटेल मॅनेजमेंट विभागांना भेट दिली. तेव्हा व्यवसायभिमुख अभ्यासक्रम ही काळाची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांनी संस्थेच्या व महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख मांडला. संस्थेचे सचिव मा.श्री. जवाहर शाह वाघोलीकर यांच्या हस्ते एस.निरंजन रेड्डी यांचा सत्कार करण्यात आला.

कृषीमंत्री एस.निरंजन रेड्डी यांनी अनेकान्त इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजला देखील भेट दिली. याप्रसंगी डॉ.एम. ए. लाहोरी यांनी माहिती दिली. अनेकान्त इंग्लीश मिडीयम स्कूलला देखील भेट दिली. बारामतीमध्ये अशा प्रकारची शैक्षणिक क्षेत्रात अग्रणी शाळा असल्याचे कौतुक त्यांनी केले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्कूलकडून ऑनलाईन एज्युकेशनसाठी सुरु असलेल्या विविध उपक्रमांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. स्कूलच्या मुख्याध्यापिका राखी माथूर यांनी अनेकान्त स्कूलबाबत माहिती दिली. संस्थेच्या या तीनही शैक्षणिक घटकांशी तेलंगणा राज्यात सहकार्य करायला निश्चितच आम्हांला आवडेल अशी भावना त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

यावेळी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सदस्य श्री.मिलिंद शहा वाघोलीकर, धवल शाह वाघोलीकर, बारामतीचे माजी नगराध्यक्ष श्री. सदाशिव सातव, उपप्राचार्य डॉ.अविनाश जगताप, डॉ.अजित तेलवे, श्री.इंद्रजित धुमाळ हे उपस्थित होते.

Tuljaram Chaturchand College Baramati ★ Library

मा. प्राचार्य साहेब.

7 8

सकाळ दि- ६/१२/२०२० पा.नं- ३

# अनेकान्त स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**बारामती :** येथील अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये प्रसिद्ध आहारतज्ज्ञ व न्युट्रिशिनिस्ट राधिका शहा (वाघोलीकर) यांचे ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांना शहा यांनी मार्गदर्शन केले. आहार कसा असावा, त्यात कोणत्या अन्नाचा समावेश असावा, पालकांनीही मुलांना कशा पद्धतीचा आहार द्यावा, त्याच्या वेळा कशा असाव्यात, व्यायाम कसा करावा, जेवणाच्या वेळा कशा असाव्यात, आहारात पोषकता कशी असावी याची त्यांनी माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ, सचिव जवाहर वाघोलीकर आणि शाळा समितीचे अध्यक्ष मिलिंद वाघोलीकर, प्राचार्या राखी माथूर यांनी शहा यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल शेळके यांनी केले. सकाळ ६/१२/२० 3

सकाळ दि- ६/१२/२० पा.नं-३

# बारामतीच्या एम्समध्ये सॅप प्रणाली शिकवली जाणार

**बारामती, ता. ६ :** येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् (एम्स) व नेक्स्टजन एज्युकेशन फाउंडेशन यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. या माध्यमातून बारामती पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना सॅप (SAP) तंत्रज्ञानाची परिपूर्ण माहिती व प्रमाणित कोर्स करण्याची संधी दिली जाणार आहे.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात अशा कंपन्यांमध्ये नोकरी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रतेबरोबरच सॅप तंत्रज्ञान अवगत असणे क्रमप्राप्त झाले आहे. हीच गरज ओळखून अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामती या संस्थेने हा सामंजस्य करार केलेला आहे. यावेळी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरहतदास शहा (सराफ) आणि सचिव जवाहर वाघोलीकर यांनी या सर्वांचे अभिनंदन केले. संस्थेचे सचिव मिलिंद वाघोलीकर व संचालक डॉ. एम. ए. लाहोरी यांनी विद्यार्थ्यांना सॅप तंत्रज्ञान आणि भविष्यातील संधी याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी नेक्स्टजनचे सल्लागार चिन्मय नानोटी यांनी औद्योगिक क्षेत्रामध्ये सॅप तंत्रज्ञानाचा वापर आणि येणाऱ्या काळात त्याची संभाव्य व्याप्ती याबाबत मार्गदर्शन केले. सकाळ ६/१२/२०, 3

दै. पुढारी दि- ६/१२/२० पा.नं-३

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लवकरच देणार सातवा वेतन आयोग

**पुणे :** राज्यातील अकृषी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग देण्याचा निर्णय उच्चशिक्षण व तंत्रज्ञान विभागाकडून येत्या चार दिवसांत जाहीर होणार आहे. याबाबतची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी ट्विटरद्वारे दिली आहे. त्यामुळे राज्यातील हजारो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा फायदा होणार आहे.

सातव्या वेतन आयोगाची अधिसूचना प्रसिद्ध करणे, आश्वासित प्रगती योजना लागू, पदोन्नतीतील आरक्षण लागू करणे अशा प्रमुख मागण्यांबाबत लेखी निर्णय होईपर्यंत विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी आंदोलन करीत, विद्यापीठांच्या परीक्षांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला होता. सामंत यांनी मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते. त्या आश्वासनानुसार सामंत यांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन देण्यासंदर्भात येत्या चार दिवसांत निर्णय होईल, अशी माहिती ट्विटद्वारे दिली.

राज्य सरकारने प्राध्यापकांनादेखील दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सरकारने राज्यातील प्राध्यापकांचे ४ फेब्रुवारी २०१३ ते १० मे २०१३ या ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन देण्याचा निर्णय घेतला आहे. पुढारी ६/१२/२० ५।१।३

Tuljaram Chaturchand College Library Baramati

ABS
[signature] ७/१२